cmyk

## संपादकीय

### युद्धविरामाची संधी आणि भारतापुढील आव्हाने

अमेरिका ही जगातील सर्वांत प्रभावशाली महासत्ता मानली जाते, तर इस्रायल हा तिचा विश्वासू मित्रदेश म्हणून ओळखला जातो. दुसरीकडे, इराण हा पश्चिम आशियातील महत्त्वाचा प्रादेशिक खेळाडू आहे. अणुकार्यक्रम, प्रादेशिक वर्चस्व आणि सुरक्षेच्या मुद्यांवरून गेल्या काही वर्षांत या देशांमधील तणाव सातत्याने वाढत गेला. या संघर्षाने केवळ संबंधित देशांनाच नव्हे, तर संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलले. युद्धाचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेपासून ते सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनापर्यंत उमटले.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र वर्ष–६ अंक–८५ सोमवार दि.१५ जून २०२६ RNI No.: MAHMAR/2021/858 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### भारताचे पहिले खासगी रॉकेट उड्डाणासाठी सज्ज

नवी दिल्ली : भारत पुन्हा एकदा अंतराळात इतिहास रचण्याच्या तयारीत आहे. देशाचे पहिले खासगी रॉकेट विक्रम-१ च्या प्रक्षेपणासाठी काउंटडाउन सुरू झाले आहे. म्हणजेच भारत अंतराळात आणखी एक मोठा टप्पा गाठणार आहे. भारताच्या पहिल्या खासगी रॉकेटचा एक फोटोही समोर आला आहे. याचे प्रक्षेपण आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून होणार आहे. विक्रम-१ रॉकेटच्या दुस-या टप्प्याचे इंटिग्रेशन पूर्ण झाले आहे. या टप्प्याला कलाम-२५० असे नाव देण्यात आले आहे. रॉकेटचा एक फोटो सोशल मीडियावर समोर आला आहे, ज्यामध्ये ते उड्डाणासाठी सज्ज असल्याचे दिसत आहे. या चार टप्प्यांच्या रॉकेटचा दुसरा टप्पा पूर्ण झाला आहे. त्यानंतर आता उर्वरित दोन टप्पे पूर्ण झाल्यावर ते उड्डाणासाठी तयार होईल.

### भारतीय तिरंदाजांचा सुवर्णवेध!

अंताल्याः तुर्कीच्या अंताल्या येथे सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्टेज ३ स्पर्धेतून भारतासाठी एक अत्यंत अभिमानास्पद आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. भारताचे शूर तिरंदाज धीरज बोम्मादेवरा आणि कुमकुम मोहोद या जोडीने अप्रतिम कौशल्याचे प्रदर्शन करत रिकर्व्ह मिश्र सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. या अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक अंतिम सामन्यात भारतीय जोडीने बलाढ्य ऑलिम्पिक चॅम्पियन दक्षिण कोरियाचा ५-१ (३७-३६, ३७-३६, ३९-३९) असा धुव्वा उडवला. या हाय-व्होल्टेज सामन्यात २४ वर्षीय धीरज आणि अवघ्या १७ वर्षांची युवा कुमकुम मोहोद यांच्यात जबरदस्त ताळमेळ पाहायला मिळाला. जागतिक क्रमवारीत १६ व्या क्रमांकावर असलेल्या धीरजने सामन्याच्या शेवटच्या क्षणी अचूक 'परफेक्ट १०' चा स्कोअर करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. दोघांनीही संपूर्ण सामन्यात प्रत्येकी ३-३ वेळा 'परफेक्ट १०' चा वेध घेतला. धीरज आणि कुमकुम या दोघांचेही मिक्स्ड टीममधील हे कारकिर्दीतील पहिलेच विश्वचषक सुवर्णपदक आहे.

### भाजपाने लोकशाहीचा गळा घोटला–नाना पटोले

मुंबईः ना रहेगा बास ना बजेगी बासरी याच म्हणीचा वापर करत भाजप आणि मोदी सरकार देशात कारभार करत असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रक्रियेवर आणि ईव्हीएम मशीनच्या सुरक्षेवर त्यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ईव्हीएममधील गडबड सुप्रीम कोर्टात पोहोचताच भाजपने मशिन्स जाळल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला आहे. भाजप सरकारने पश्चिम बंगालमध्ये लोकशाहीचा गळा घोटल्याचे पटोले म्हणाले. पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगापासून ते संपूर्ण निवडणूक मॅनेजमेंट आणि मॅच फिक्सिंग हे भाजपच्या बाजूने करण्याचा प्रयत्न झाला. हे चित्र संपूर्ण देश आणि पश्चिम बंगालची जनता उघड्या डोळ्यांनी पाहत होती. हे संपूर्ण प्रकरण आता सुप्रीम कोर्टापर्यंत पोहोचले आहे. ईव्हीएम मशीनमध्ये मोठ्या प्रमाणावर फेरफार आणि गडबड करण्यात आल्याचा आरोप पटोले यांनी केला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६८.५० क्विंटल | २,००० | २,५०१ | २,२९९ |
| ज्वारी/हायब्रिड : ४८.५० क्विंटल | २,१६४ | ३,९२७ | २,८९२ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,२९६ | २,४६५ | २,३८१ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,३०१ | ५,४०० | ५,३५० |

# शक्तीपीठ रद्दसह शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करा !

## राजू शेट्टी यांचा रोहित पवार यांच्या आंदोलनाला पाठिंबा

पंढरपूर । प्रतिनिधी

**उद्योजकांची कर्ज माफ करताना सरकारने जो न्याय लावला, तोच न्याय शेतकऱ्यांना लावून विनाअट सरसकट कर्जमाफी करावी. महाराष्ट्राच्या काहीही फायद्याची नसलेली बुलेट ट्रेन असो किंवा शक्तीपीठ महामार्गासारखे प्रकल्प रद्द करावेत. पण सरकारने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्याची स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे प्रमूख माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली.**

पंढरपूरमध्ये आ. रोहित पवार यांचे सुरु असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला तिसऱ्या दिवशी शेतकरी नेते माजी खा. राजू शेट्टी यांनी भेट देऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी राजु शेट्टी बोलत होते. राजू शेट्टी म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची मते घेताना देवेंद्र फडणवीस हे ७/१२ कोरा... कोरा... कोरा... असे तीन वेळा म्हणाले होते. सातबारा कोरा करणे तर सोडाच पण आता विना निकष दोन लाख देखील शेतकऱ्यांना देत नाहीत. आज शेतकरी आर्थिक संकटात



सापडला आहे. वाढते उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे तो अडचणीत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कोणतेही निकष न लावता संपूर्ण कर्जमाफी ही काळाची गरज बनली आहे.

राजु शेट्टी पुढे म्हणाले की, सरकारने उद्योगपतींची एका झटक्यात १६ लाख कोटींची कर्जमाफी केली. त्यावेळी कोणते नियम लावले ▶▶ पान २ वर

### दोन दिवसात निर्णय घ्या अन्यथा...

संपुर्ण कर्जमाफीबाबतचा निर्णय जून अखेर पर्यंत घेतला नाही तर या राज्यातील जनता फडणवीस आणि शिंदे सरकारला माफ करणार नाही. ज्या शेतकऱ्यांनी तुम्हाला मते देवून खुर्चीवर बसवले. त्यांना वाऱ्यावर सोडू नका, ते तुम्हाला माफ करणार नाहीत. सरकारने शक्तीपीठ महामार्गाचे बजेट वाढून २०२९ च्या निवडणुकीसाठी पैशाची तयारी सुरु केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य शेतकरी पेटून उठला आहे.

### रोहित पवारांचे कुटुंबीय भावूक; मुलांचे डोळे पाणावले

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार गेल्या तीन दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीतील जाचक अटी रद्द कराव्यात, या मागणीसाठी अन्नत्याग आंदोलन करत आहेत. रविवारी आ. रोहित पवार यांच्यासाठी सर्व वैद्यकीय सुविधेसह डॉक्टरांची टीम सज्ज होती. मात्र, रोहित पवार यांनी सलाईन लावण्यास नकार दिला. रोहित पवारांचे संपूर्ण कुटुंबीय आंदोलनस्थळी दिसून आले, लेकरा-बाळांसह आई-वडिलही आंदोलनस्थळी भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. आमदार रोहित पवार यांच्या पत्नी, मुलगी-मुलगी आणि आई-वडिल देखील आंदोलनस्थळी लोकांमध्ये बसून होते. आ. रोहित पवारांची प्रकृती खालावल्याचे सांगण्यात आल्यानंतर पत्नी कुंती पवार आणि त्यांची दोन्ही मुले त्यांच्याजवळ पोहोचले. यावेळी, वडिलांची अवस्था पाहून मुलांचे डोळे पाणावले होते.

# पंढरपूर मार्गावर भीषण अपघातात ८ जणांचा मृत्यू

## देवदर्शनाहून १४ जणांना घेवून निघालेला पिकअप विहिरीत कोसळला,शासनाकडून ५ लाखाची मदत

पंढरपूर । प्रतिनिधी

**सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातून धक्कादायक आणि मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. म्हसवड येथील सिद्धनाथाचे दर्शन घेऊन परतणाऱ्या भाविकांच्या पिकअप गाडीचा तांदूळवाडी गावाजवळ भीषण अपघात झाला. भाविकांनी भरलेली ही पिकअप थेट रस्त्याशेजारील विहिरीत पडली. या भीषण दुर्घटनेत ८ जणांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, ६ जणांना वाचवण्यात यश आले आहे. या घटनेचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओही समोर आला असून, या दुर्घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे.**



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी असलेले भाविक म्हसवड येथील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून आपल्या गावाकडे पिकअप वाहनाने परतत असताना, म्हसवड-पंढरपूर मार्गावरील माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावाजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. गाडी थेट रस्त्या कडेला असलेल्या एका खोल विहिरीत जाऊन कोसळली. या पिकअपमध्ये लहान मुलांसह एकूण १४ प्रवासी स्वार होते. गाडी विहिरीत पडल्याचा मोठा आवाज होताच, परिसरातील स्थानिक ▶▶ पान २ वर

# जगाच्या शाश्वत विकासात भारताचे मोठे योगदान!

## फ्रान्समध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींचे प्रतिपादन

पॅरीस । वृत्तसंस्था

भारताच्या तरुणांची मानसिकता नवीन आहे, जी संपूर्ण मानवतेचा विचार करते. भारत शाश्वत भविष्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी नवनिर्मिती करत आहे. नाविन्यता ही भारताच्या डीएनएमध्येच आहे. हजारो वर्षांपासून भारताने वैद्यकशास्त्र, योग, गणित आणि विज्ञानातील आपल्या योगदानातून मानवतेच्या प्रगतीला आकार दिला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. १४ जून) केले.



फ्रान्समधील नीस येथे फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या उपस्थितीत भारत इनोव्हेट्सच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, ▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री विद्यार्थ्यांच्या स्वागताला; देवेंद्र फडणवीस अन् सुनेत्रा पवारांची शाळा ठरली

## एकनाथ शिंदेंनी वाटल्या सायकल

मुंबई । प्रतिनिधी

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर आज १५ जूनपासून राज्यातील शाळा सुरू होत असून गावागावात शाळेची घंटा वाजणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री शाळेत हजर राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पहिल्या दिवशी पनवेलच्या वहाळ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांसोबत आपला वेळ घालवणार आहेत. तर, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ह्या मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे हजेरी लावणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप केले आहे.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त राज्यभर राबविण्यात येत असलेल्या 'शाळा प्रवेशोत्सव' उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री रायगड जिल्ह्यात तर उपमुख्यमंत्री ▶▶ पान २ वर



# पहिल्याच दिवशी पंधरा लाख विद्यार्थ्यांना मिळणार पुस्तके

बीड । प्रतिनिधी

समग्र शिक्षा व 'पीएमश्री' योजनेंतर्गत जिल्ह्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण विभागाकडून जोरदार तयारी सुरू आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र (बालभारती), छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत बीड जिल्ह्यासाठी पाठ्यपुस्तकांचा पुरवठा केला जात असून, १३ जून २०२६ अखेर जिल्ह्याला आवश्यक असलेल्या एकूण पुस्तकांपैकी ८८.८८ टक्के पुस्तके प्राप्त झाली आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तके पडावीत, यासाठी जिल्हा प्रशासनाने युद्धपातळीवर नियोजन केले आहे. जिल्ह्यासाठी एकूण १६ लाख ९२ हजार ४८२ पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदवण्यात ▶▶ पान २ वर

### पहिल्या दिवशी वितरण

''प्राप्त झालेली पाठ्यपुस्तके संबंधित शाळांपर्यंत पोहोचवण्याची कार्यवाही जलद गतीने सुरू आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी विनामूल्य पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करण्यात आले असून, शिक्षण विभाग यासाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे.''

**– धनंजय शिंदे**
**(उपशिक्षणाधिकारी तथा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, जि. प. बीड).**

# पेट्रोल-डिझेल पुन्हा महागण्याचे संकेत !

## कोट्यवधी जनतेची चिंता वाढली

त्रिशूर । वृत्तसंस्था

भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांबाबत पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. नुकतेच केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी केलेल्या एका विधानाने जनतेच्या मनात आगामी काळात इंधन दरवाढ होणार का, असा प्रश्न निर्माण केला आहे. सरकारकडून सध्यातरी याबाबत कोणतीही थेट घोषणा करण्यात आलेली नसली, तरी भविष्यातील पेट्रोल-डिझेलचे दर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या स्थितीवर अवलंबून असतील, असे संकेत मंत्र्यांच्या विधानातून मिळाले आहेत.

केरळमधील त्रिशूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना सुरेश गोपी यांनी स्पष्ट केले की, सरकार सध्या जागतिक ऊर्जा बाजारावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमतींमधील कोणताही बदल हा कच्च्या तेलाची उपलब्धता आणि त्याच्या पुरवठ्याची स्थिरता विचारात घेऊनच केला जाईल. इंधनाचे दर पुन्हा वाढणार का, या प्रश्नावर ▶▶ पान २ वर

# होर्मूझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली होणार पश्चिम आशियात शांततेची आशा वाढली



दिल्ली । वृत्तसंस्था

**अमेरिका आणि इराणमधील युद्ध थांबवण्यासाठीच्या शांतता करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत आणि होर्मूझची सामुद्रधुनी तात्काळ सर्वांसाठी खुली होणार आहे, असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.**

शांतता कराराबाबत अमेरिका आमि इराणमधील वाटाघाटी अंतिम टप्प्यात असून करारावर स्वाक्षऱ्या होणार असल्याचे पाकिस्तानने म्हटले होते. त्यानंतर लगेचच ट्रम्प यांनी असे म्हटले आहे. मात्र स्वाक्षऱ्या होण्याच्या वेळापत्रकाबाबत इराणकडून कोणतीही टिप्पणी आलेली नाही. शांतता करारावर स्वक्षऱ्या झाल्यानंतर लगेचच होर्मूझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली होईल, असे ट्रम्प यांनी सोशल मीडियावरच्या पोस्टमध्ये म्हटले आहे. अनेक महिन्यांचा संघर्ष आणि वाटाघाटींनंतरचे हे मोठे राजनैतिक यश आहे. मात्र त्याच वेळी जर अपेक्षेप्रमाणे करार होऊ शकला नाही, तर नव्याने हल्ले करण्याचा इशाराही ट्रम्प यांनी दिला आहे. आम्हाला इराणबरोबर आणि संपूर्ण मध्यपूर्वेबरोबर मिळून भविष्यात दीर्घकाळापर्यंत काम करायचे आहे. ही प्रक्रिया लवकरात लवकर, सहजपणे आणि सरळपणे पार पडेल अशी आशा आपल्याला वाटते आहे. जर तसे झाले ▶▶ पान २ वर

# मातोश्रीवर सगळ्या खासदारांची उपस्थिती

## 'आम्ही ऑपरेशन वुल्फ' राबविणार–संजय राऊत



मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदारांची बैठक मुंबईतील मातोश्री निवासस्थानी रविवारी पार पडली. या बैठकीला काही खासदारांनी प्रत्यक्ष हजेरी लावली, तर काही खासदारांनी त्यांच्या कौटुंबिक आणि स्थानिक ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# युद्धविरामाची संधी आणि भारतापुढील आव्हाने

अमेरिका ही जगातील सर्वांत प्रभावशाली महासत्ता मानली जाते, तर इस्रायल हा तिचा विश्वासू मित्रदेश म्हणून ओळखला जातो. दुसरीकडे, इराण हा पश्चिम आशियातील महत्त्वाचा प्रादेशिक खेळाडू आहे. अणुकार्यक्रम, प्रादेशिक वर्चस्व आणि सुरक्षेच्या मुद्यांवरून गेल्या काही वर्षांत या देशांमधील तणाव सातत्याने वाढत गेला. या संघर्षाने केवळ संबंधित देशांनाच नव्हे, तर संपूर्ण जगाला अस्थिरतेच्या गर्तेत ढकलले. युद्धाचे पडसाद जागतिक अर्थव्यवस्थेपासून ते सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनापर्यंत उमटले. अशा परिस्थितीत युद्धविराम आणि शांतता कराराची चर्चा सुरू होणे ही जगासाठी दिलासादायक बाब मानावी लागेल.

युद्ध सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच इराणला नमविण्याचे दावे करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात संघर्ष दीर्घकाळ चालला आणि त्यातून एक महत्त्वाचा धडा समोर आला. आधुनिक युद्धे केवळ लष्करी ताकदीवर जिंकली जात नाहीत. राष्ट्राची जिद्द, संसाधनांचे व्यवस्थापन, भौगोलिक स्थान आणि राजनैतिक संबंध यांचाही त्यात तितकाच मोठा वाटा असतो. इराणने मर्यादित साधनसामग्री असूनही मोठ्या शक्तींना दीर्घकाळ गुंतवून ठेवले. त्यामुळे जगातील सामरिक समीकरणे पुन्हा एकदा चर्चेत आली.

या संघर्षाचा सर्वांत मोठा परिणाम जागतिक ऊर्जा क्षेत्रावर झाला. होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील तेलवाहतुकीचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू याच मार्गाने विविध देशांपर्यंत पोहोचतात. युद्धामुळे या मार्गावरील वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्याने तेलाच्या किमती वाढल्या, पुरवठा साखळी विस्कळीत झाली आणि अनेक देशांसमोर ऊर्जा सुरक्षेचे संकट उभे राहिले. त्याचा थेट परिणाम महागाईवर झाला. इंधन महागले की वाहतूक खर्च वाढतो, उत्पादन खर्च वाढतो आणि शेवटी सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर त्याचा ताण येतो. भारतासाठी ही परिस्थिती विशेष चिंताजनक ठरली. जगातील सर्वांत मोठ्या इंधन आयातदार देशांपैकी एक असलेल्या भारताची अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात ऊर्जा आयातीवर अवलंबून आहे. देशाचा औद्योगिक विकास, वाहतूक व्यवस्था, शेती आणि सेवा क्षेत्र या सर्वांची गती ऊर्जा पुरवठ्यावर अवलंबून आहे. त्यामुळे पश्चिम आशियातील अस्थिरता भारतासाठी केवळ परराष्ट्र धोरणाचा विषय राहत नाही, तर ती आर्थिक आणि सामाजिक स्थैर्याशी जोडलेली बाब बनते. गेल्या काही वर्षांत भारताने ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण करण्याचा प्रयत्न केला असला, तरी आयातीवरील अवलंबित्व अजूनही मोठे आहे. अशा वेळी अमेरिका आणि इराण यांच्यातील शांतता कराराचा मसुदा आशेचा किरण ठरू शकतो. संघर्ष थांबविणे, होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक पूर्ववत करणे, नौदल नाकेबंदी हटविणे, सार्वभौमत्वाचा परस्पर आदर राखणे आणि अणुकार्यक्रमाबाबत वाटाघाटी करणे यांसारखे मुद्दे सकारात्मक मानावे लागतील. कोणत्याही युद्धाचा शेवट अखेरीस चर्चेच्या टेबलावरच होतो, हा इतिहासाचा धडा आहे. त्यामुळे युद्धाच्या रणांगणापेक्षा संवादाचे व्यासपीठ अधिक प्रभावी ठरते.

इराणवरील आर्थिक निर्बंध शिथिल करण्याच्या चर्चेलाही विशेष महत्त्व आहे. निर्बंधांमुळे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था कमकुवत होऊ शकते; परंतु त्याच वेळी जागतिक व्यापार आणि ऊर्जा बाजारपेठेवरही त्याचे परिणाम होत असतात. जर निर्बंध हटविले गेले, तर जागतिक तेलबाजाराला काही प्रमाणात स्थैर्य मिळू शकते. त्याचा सकारात्मक परिणाम भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थांवर होण्याची शक्यता आहे. मात्र, युद्धविराम म्हणजे कायमस्वरूपी शांतता असे समजणे धोकादायक ठरेल. अनेकदा युद्धविराम हा केवळ संघर्षातील तात्पुरता विराम असतो. वास्तविक शांततेसाठी विश्वास, पारदर्शकता आणि दीर्घकालीन राजनैतिक बांधिलकी आवश्यक असते. विशेषतः अण्वस्त्रांशी संबंधित प्रश्नांवर दोन्ही बाजूंनी प्रामाणिकपणे भूमिका घेतली, तरच हा करार टिकाऊ ठरू शकतो. अन्यथा पुन्हा तणाव वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

जगाने यापूर्वीही अनेक युद्धांचे दुष्परिणाम अनुभवले आहेत. युद्धे जिंकणारे आणि हरणारे दोन्ही पक्ष अखेरीस नुकसानच सहन करतात. जीवितहानी, वित्तहानी, विस्थापन, बेरोजगारी आणि सामाजिक अस्थिरता यांचे परिणाम अनेक दशकांपर्यंत जाणवतात. रशिया-युक्रेन संघर्षाने हेच वास्तव अधोरेखित केले. युद्ध संपले तरी त्यातून निर्माण झालेल्या जखमा भरून निघण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यामुळे कोणत्याही संघर्षाचा शाश्वत उपाय संवाद आणि सहकार्य हाच असतो.

भारतासाठी या घडामोडींमधून एक महत्त्वाचा संदेश आहे. जागतिक परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी आर्थिक लवचिकता, दूरदृष्टीचे धोरण आणि संतुलित परराष्ट्र संबंध यांच्या बळावर संकटांवर मात करता येते. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांपासून ते महामारीसारख्या संकटांपर्यंत भारताने अनेक आव्हानांचा सामना केला आहे. आजही ऊर्जा सुरक्षितता, महागाई नियंत्रण आणि आर्थिक स्थैर्य ही मोठी आव्हाने आहेत. त्यामुळे युद्धविरामाची ही संधी भारताने केवळ तात्पुरता दिलासा म्हणून न पाहता, ऊर्जा स्वावलंबन आणि दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेच्या दिशेने वाटचाल करण्याची संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. युद्धाचा मार्ग विनाशाकडे नेतो, तर संवादाचा मार्ग विकासाकडे. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य शांतता करार हा केवळ दोन देशांमधील करार नसून जागतिक स्थैर्य, ऊर्जा सुरक्षा आणि आर्थिक पुनर्बांधणीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. या संधीचे रूपांतर कायमस्वरूपी शांततेत झाले, तर त्याचा सर्वाधिक लाभ जगातील सामान्य नागरिकांनाच होईल. भारतालाही या बदलातून आर्थिक दिलासा मिळण्याची आशा बाळगता येईल.

## रेणुकामाता मंदिराला तीर्थक्षेत्राचा ‘ब’ दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील-ना.पंकजा मुंडे



**जालना। प्रतिनिधी**


**सोमठाणा (ता. बदनापूर) येथील श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिराला तीर्थक्षेत्राचा 'ब' दर्जा देण्यासाठी प्रयत्न करू अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जिल्हयाच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकिर्दीला बारा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या हस्ते आज महाआरती आणि मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.**

ना. पंकजाताई मुंडे आज जालना दौऱ्यावर आल्या होत्या.छत्रपती संभाजीनगर येथून जालन्याकडे जाताना रस्त्यात बदनापूर तालुक्यातील सोमठाणा येथील श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिरात त्यांनी महाआरती केली. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विकासाचे एक तप पूर्ण केले आहे, तळागाळातील सर्व सामान्य माणसाच्या विकासाचा संकल्प पूर्ण करणाऱ्या नेतृत्वाच्या पाठिशी आपण खंबीरपणे उभे रहावे असे आवाहन त्यांनी केले. राज्याच्या सुख-समृद्धीसाठी देखील त्यांनी यावेळी प्रार्थना केली. याप्रसंगी मंदिर ट्रस्टने केलेल्या मागणीनुसार मंदिराच्या विकासासाठी आपण कटिबध्द आहोत असे सांगून नवरात्रोत्सवात पुन्हा एकदा दर्शनाला येऊ असा शब्द त्यांनी दिला. आ. नारायण कुचे, प्रवीण घुगे, सतीश नागरे, बद्रीनाथ पठाडे आदी यावेळी उपस्थित होते. मंदिर ट्रस्टच्या वतीने याप्रसंगी ना. पंकजाताईंचा सत्कार करण्यात आला तसेच त्यांच्या वृक्ष लागवड देखील करण्यात आली.

## सेवानिवृत्त नायब तहसीलदार विलासराव धोंडे यांचे निधन

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी येथील रहिवासी तथा सेवानिवृत्त नायब तहसीलदार विलासराव ऊर्फ बाबूराव पांडुरंग धोंडे यांचे सोमवारी अहिल्यानगर येथील त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७४ वर्षे होते.**



स्व.विलासराव पांडुरंग धोंडे (७४ वर्षे) निधन : ०८ जून २०२६

गेल्या काही दिवसांपासून ते हृदयविकाराच्या आजाराने त्रस्त होते. शासकीय सेवेत प्रामाणिकपणे व कर्तव्यदक्षतेने काम करून त्यांनी प्रशासनात आपला वेगळा ठसा उमटवला होता. त्यांच्या निधनाची बातमी समजताच आष्टी परिसरासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी आष्टी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, एक बहीण, दोन मुले, एक मुलगी, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. पुणे येथील प्रसिद्ध लेखक, सहज जलबोधकार व भूजलवैज्ञानिक उपेंद्र धोंडे यांचे ते वडील होत. विलासराव धोंडे यांच्या निधनाने धोंडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून सामाजिक, प्रशासकीय व शैक्षणिक क्षेत्रातून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

## महेश सेवा संघाच्या अध्यक्षपदी किशोरकुमार बाहेती, सचिवपदी केदार जाजू यांची बिनविरोध निवड

**बीड । प्रतिनिधी**

**बीड येथील माहेश्वरी समाजातील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या महेश सेवा संघाच्या अध्यक्षपदी किशोरकुमार बाहेती तर सचिवपदी केदार जाजू यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महेश नवमीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे संघाची नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली.**





यासंदर्भात राजस्थानी विद्यालय येथे वार्षिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस मावळते अध्यक्ष डॉ. संकेत बाहेती, मावळते सचिव आनंद बाहेती, संघाचे ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत मावळते सचिव आनंद बाहेती यांनी गेल्या वर्षभरात संघामार्फत राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा सादर केला. तर अध्यक्ष डॉ. संकेत बाहेती यांनी कार्यकाळात मिळालेल्या सहकार्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले. नूतन कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी सुशील सारडा आणि सुरेश काबरा, कोषाध्यक्षपदी ॲड. जुगलकिशोर पल्लोड तसेच सहसचिवपदी मनोज मालाणी यांची निवड करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या आगामी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, किशोरकुमार बाहेती हे महेश सेवा संघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सहाव्यांदा स्वीकारत आहेत. सामाजिक कार्याचा प्रदीर्घ अनुभव असलेले बाहेती सध्या राजस्थानी सेवा समाजाचे सहसचिव म्हणूनही कार्यरत आहेत. गेल्या तीन दशकांपासून त्यांनी महेश सेवा संघाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला आहे. निवडीनंतर बोलताना अध्यक्ष किशोरकुमार बाहेती यांनी संघामार्फत सुरू असलेले सर्व सामाजिक उपक्रम पूर्ववत सुरू ठेवण्याबरोबरच यंदाच्या वर्षात काही नवीन उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. समाजहित, युवा सहभाग आणि सेवाभावी उपक्रमांना अधिक चालना देण्यासाठी कार्यकारिणी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. महेश सेवा संघाच्या नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे माहेश्वरी समाजात समाधानाचे वातावरण असून नव्या नेतृत्वाकडून समाजोपयोगी कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# माहेश्वरी बहू मंडळाचा ‘एक बहीण एक औषधी वनस्पती’ उपक्रम उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत बीड येथे महेश नवमीच्या औचित्याने माहेश्वरी बहू मंडळाच्या वतीने 'एक बहीण एक औषधी वनस्पती' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करत बीडसह संपूर्ण महाराष्ट्रातील नागरिकांना हरित संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमात उपस्थित महिला भगिनींना आवळा, तुळस, कडुनिंब, कढीपत्ता, हडजोड, ओवा, गवती चहा, गुळवेल, पुदिना यांसह ११ प्रकारच्या बहुगुणी औषधी वनस्पतींची रोपे भेट देण्यात आली. घरच्या घरी आरोग्य संवर्धनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या वनस्पतींचे महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले. यावेळी डॉ. सीमा चरखा यांनी औषधी वनस्पतींचे आरोग्यदायी फायदे, त्यांचा दैनंदिन जीवनातील उपयोग तसेच रोपांची योग्य काळजी कशी घ्यावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थित महिलांना औषधी वनस्पतींच्या संवर्धनाचे महत्त्व अधिक प्रभावीपणे समजले. हा उपक्रम माहेश्वरी बहू मंडळाच्या अध्यक्षा कविता कलंत्री, उपाध्यक्षा सुवर्णा कासट, सचिव सोनल बाहेती, कोषाध्यक्षा आरती चरखा तसेच अमृता कलंत्री, शोभा लाहोटी, जयश्री लाहोटी आणि इतर पदाधिकारी भगिनी यांच्या अथक परिश्रमातून यशस्वीपणे पार पडला. पर्यावरण संरक्षणासोबतच घराघरात औषधी वनस्पतींचे संवर्धन व्हावे, नागरिकांमध्ये वृक्षारोपणाची आवड निर्माण व्हावी आणि निरोगी जीवनशैलीला चालना मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. उपक्रमाला उपस्थित महिला भगिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## पान १ वरून...

### शक्तीपीठ रद्दसह शेतकऱ्यांची

होते, असा सवाल उपस्थित केला. आणि शेतकरी कर्जमाफीसाठीच का नियम लावले जात आहेत. असा सवालही केला आहे. सरकारकडे बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, शेतकऱ्यांचा विरोध असलेला शक्तीपीठ महामार्ग करण्यासाठी पैसे आहेत. मग शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करण्यासाठी पैसे नाहीत का? पैसे नसतील तर शेतऱ्यांच्या फायद्याचा नसलेले बुलेट ट्रेन, शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा आणि सरसकट शेतकरी कर्जमाफी करावी, अशी मागणी सरकारकडे केली आहे. शेतकऱ्यांचा संघर्ष हा केवळ एका व्यक्तीचा, संघटनेचा किंवा कोणत्याही राजकारणासाठी नसून संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. अन्नदात्याला न्याय मिळाल्याशिवाय राज्याचा विकास शक्य नाही. या आंदोलनाकडे कोणत्याही राजकीय दृष्टिकोनातून बघु नये. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठीचा हा लढा सुरु आहे आणि तो यशस्वी करण्यासाठी प्रत्येक गावात, शहरात रस्त्यावर उतरण्याची वेळ आली तर उतरु, असा इशाराही शेट्टी यांनी दिला आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटात गेलेले बच्चू कडू यांना उद्देशून शेट्टी म्हणाले की, बच्चू कडू हे कोठेही असू द्या, त्यांना या आंदोलनाला पाठिंबा द्यावाच लागणार आहे. शेवटी शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याचे सांगीतले.

-------------

### जगाच्या शाश्वत विकासात

भारत जागतिक इनोव्हेशनमधील एक उगवती शक्ती आहे. भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक न राहता उपाय (सोल्यूशन्स) पुरवणारा देश बनत आहे. भारत एक जागतिक इनोव्हेशन सोल्यूशन्स हब म्हणून उदयास येत आहे. देश तरुण आणि तळागाळातील परिसंस्थेला पाठबळ देत नाविन्यतेची सांगड सर्वसमावेशकता आणि शाश्वततेशी घालत आहे. पंतप्रधान मोदींनी भारताच्या तरुणांचे कौतुक केले. तरुण केवळ संकुचित व्यावसायिक हितसंबंधांसाठी काम न करता मानवतेच्या कल्याणासाठी उपाय शोधत आहेत, असे ते म्हणाले. ‘‘भारताच्या तरुणांची मानसिकता नवीन आहे, जी संपूर्ण मानवतेचा विचार करते,‘‘ असे मोदी म्हणाले. भारताच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी शाश्वतता असून भारत जगासाठी नवनवीन शोध लावत आहे, यावर पंतप्रधानांनी पुन्हा एकदा भर दिला. भारत गतीने आणि मोठ्या प्रमाणावर (इनोव्हेशन करतो. भारत शाश्वत भविष्यासाठी आणि संपूर्ण जगासाठी इनोव्हेशन करतो,‘‘ असे ते म्हणाले. भारताच्या ऐतिहासिक वारशाचा हवाला देत मोदी म्हणाले की, इनोव्हेशन हे देशाच्या डीएनएमध्येच आहे. ‘‘हजारो वर्षांपासून भारताने वैद्यकशास्त्र, योग, गणित आणि विज्ञानातील आपल्या योगदानातून मानवतेच्या प्रगतीला आकार दिला आहे,‘‘ असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान मोदींनी जगभरातील गुंतवणूकदार, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योजकांना तंत्रज्ञानाच्या पुढील लाटेला आकार देण्यासाठी भारतासोबत भागीदारी करण्याचे आवाहन केले. ‘‘भारतात या. आमच्यासोबत काम करा. डिझाइन इन इंडिया, डेव्हलप इन इंडिया करा आणि जगासाठी उपाय शोधा,‘‘ असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी भारत-फ्रान्स संबंधांचे कौतुकही केले.

-------------

### पंढरपूर मार्गावर भीषण अपघातात

नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. विहिरीत पाणी असल्याने अनेकांचा जीव धोक्यात होता. स्थानिकांनी जीवाची पर्वा न करता तातडीने मदतकार्य सुरू केले आणि विहिरीतून ६ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश मिळवले. मात्र, दुर्दैवाने ८ जणांचा पाण्यात गुदमरून जागीच मृत्यू झाला होता. घटनेची माहिती मिळताच पंढरपूर आणि माळशिरस पोलीस प्रशासन, प्रांताधिकारी तसेच जिल्हा प्रशासनाची टीम घटनास्थळी दाखल झाली. विहिरीतून मृतदेह आणि वाहन बाहेर काढण्यासाठी तात्काळ अग्निशामक दलाची यंत्रणा आणि क्रेन पाचारण करण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने प्रथम पिकअप जीप विहिरीबाहेर काढण्यात आली, त्यानंतर बचाव पथकाने विहिरीत उतरून सर्व ८ मृतदेह बाहेर काढले. अपघातातील सर्व मृत आणि जखमी हे पंढरपूर तालुक्यातील एकाच गावचे (रांजणी) असल्याने गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एकाच वेळी गावातील ८ जणांचा अंत झाल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलीस या अपघाताचा पुढील तपास करत असून, नेमका चालक कसा चुकला याचा शोध घेतला जात आहे.

-------------

### मुख्यमंत्री विद्यार्थ्यांच्या स्वागताला

सुनेत्रा पवार पुणे जिल्ह्यातील शाळेत हजर राहतील. मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे १५ जून रोजी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. पीएम श्री योजनेअंतर्गत विकसित होत असलेली ही शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक शैक्षणिक सुविधा, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि सर्वांगीण विकासासाठी विशेष ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबाबत आवड निर्माण करणे, शाळेप्रती आपुलकी वाढविणे आणि प्रत्येक बालकाचा शाळेत आनंददायी प्रवेश सुनिश्चित करणे हा या प्रवेशोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. कार्यक्रमामध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात येणार असून, त्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांकडून स्वागतगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. सुनेत्रा पवार विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांशी संवाद साधून गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि शासनाच्या विविध शैक्षणिक उपक्रमांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दरे गावातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर ते मुंबईकडे रवाना झाले. जाण्यापूर्वी १०५ गावातील दुर्गम भागात असणाऱ्या पाचवी ते दहावीचे शिक्षण घेणाऱ्या पहिल्या टप्प्यातील २५० विद्यार्थ्यांना मोफत सायकली वाटप करून मुलांनी शिक्षणामध्ये गावाचे नाव उज्वल करावे, असा मौलिक सल्ला दिला आहे.

-----------

### पेट्रोल-डिझेल पुन्हा महागण्याचे संकेत !

उत्तर देताना त्यांनी सांगितले की, प्रथम कच्च्या तेलाचा पुरवठा कसा राहतो हे पाहावे लागेल. यावर अंतिम निर्णय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी आणि संबंधित मंत्रालय घेईल. गेल्या काही काळापासून पश्चिम आशियात सुरू असलेल्या तणाव आणि संघर्षामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठ प्रभावित झाली आहे. या भागातून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाचा आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा केला जातो. तिथल्या कोणत्याही भू-राजकीय अस्थिरतेमुळे कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ होऊ शकते, ज्याचा थेट फटका भारतासारख्या आयातीवर अवलंबून असलेल्या देशांना बसतो. भारत आपल्या गरजेच्या जवळपास ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून खरेदी करतो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किमती वाढल्यास देशांतर्गत इंधनाचा खर्चही वाढतो. गेल्या काही आठवड्यांत एलपीजी सिलिंडर, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तज्ज्ञांच्या मते, जर कच्च्या तेलाच्या किमती दीर्घकाळापर्यंत उच्च पातळीवर राहिल्या किंवा पुरवठ्यात अडथळा निर्माण झाला, तर तेल कंपन्यांवरील दबाव वाढू शकतो. अशा परिस्थितीत सरकार आणि कंपन्यांना किमतींचा पुनर्विचार करावा लागू शकतो.

-------------

### पहिल्याच दिवशी पंधरा लाख

आली होती. त्यापैकी १५ लाख ०४ हजार २३५ पुस्तके बीड जिल्ह्यात दाखल झाली आहेत. उर्वरित १ लाख ८८ हजार २४७ पुस्तकांचा पुरवठाही लवकरच होणार असून, ती आल्यावर तातडीने शाळांपर्यंत पोहोचवली जातील, अशी माहिती जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी तथा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी धनंजय शिंदे यांनी दिली.

**तालुकानिहाय पाठ्यपुस्तक प टक्केवारी पुढीलप्रमाणे :**

आष्टी, गेवराई, पाटोदा, धारूर : ९२ टक्के. केज, शिरूर कासार : ९१ टक्के. बीड, वडवणी : ८८ टक्के. माजलगाव : ८७ टक्के. अंबाजोगाई : ८६ टक्के. परळी :८५ टक्के. या शालेय पुस्तकाचे वितरण जिल्ह्यात करण्यात आले आहे. मागणी १६ लाख पुस्तकांची होती मात्र पंधरा लाख पुस्तके प्राप्त झाले असून उर्वरित एक लाख पुस्तके लवकरच प्राप्त होतील. १५ जून पासून जिल्ह्यातील सर्व शाळा सुरू होत आहेत. पाऊस आणि कडक उन्हाळा यामुळे राज्यातील काही जिल्ह्यातील शाळा पुढे ढकलल्या आहेत मात्र बीड जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद व खासगी शाळा देखील सुरू होत आहेत.

--------------

### मातोश्रीवर सगळ्या

जबाबदाऱ्यांमुळे ऑनलाइन माध्यमातून सहभाग नोंदवला. या बैठकीनंतर भाजपच्या ऑपरेशन टायगरबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले, ‘‘आम्ही स्वतःच वाघ आहोत. कसले आले ऑपरेशन टायगर? आम्ही ऑपरेशन वुल्फ (लांडग्यांची मोहीम) सुरू करू. बैठकीला सर्व खासदार उपस्थित होते.‘‘ बैठकीसाठी मुंबईतील मातोश्री या निवासस्थानी शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते आणि खासदार प्रत्यक्ष उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने अरविंद सावंत (खासदार, दक्षिण मुंबई), संजय दिना पाटील (खासदार, ईशान्य मुंबई), अनिल देसाई (खासदार, दक्षिण मध्य मुंबई), राजाभाऊ वाझे (खासदार, नाशिक) या चारही नेते प्रत्यक्ष उपस्थित होते. पक्षाचे इतर पाच खासदार वेगवेगळ्या कारणांमुळे मुंबईत येऊ शकले नाहीत. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या मुलावर पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. त्यामुळे त्यांनी रुग्णालयातूनच या बैठकीला ऑनलाइन हजेरी लावली. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पत्नीची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्यावर शिर्डी येथील दवाखान्यात उपचार सुरू आहेत. हिंगोलीचे खासदार नागेश आष्टीकर हे सध्या स्थानिक पातळीवर एका निवडणुकीच्या कामात व्यस्त आहेत. त्यांचे चिरंजीव विधान परिषदेचे उमेदवार असल्याने आष्टीकर तिथे व्यस्त आहेत, त्यामुळे त्यांनी तिथूनच ऑनलाइन हजेरी लावली. खासदार संजय देशमुख यांच्या घरी सध्या मुलीच्या लग्नाची लगबग सुरू आहे. लग्नकार्याशी संबंधित काही घरगुती बैठका आणि कामांमुळे ते यवतमाळमध्येच होते. त्यांनी घरूनच या बैठकीत व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे भाग घेतला. खासदार संजय जाधव यांनीही ऑनलाइन माध्यमातून या बैठकीला हजेरी लावत आपले मत मांडले. शिवसेना खासदार संजय राऊत यांनी सांगितले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी मुंबईत एक रुटीन बैठक होती. यात सर्व नऊ खासदारांनी भाग घेतला.

-------------

### होर्मूझची सामुद्रधुनी सर्वांसाठी

नाही, तर आमच्याकडे अंतिम पर्याय आहे. पण त्या पर्यायाचा वापर करायची वेळ आमच्यावर येता कामा नये, असेही ट्रम्प यांनी म्हटले आहे. तत्पूर्वी अमेरिका-इराणमधील करारावर २४ तासात स्वाक्षऱ्या केल्या जातील, असे पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी म्हटले होते. पाकचे उपपंतप्रधान इशाक दार आणि सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री युवराज फैजल बिन फरहान यांच्यात फोनवरून झालेल्या चर्चेनंतर शरीफ यांनी हे संकेत दिले होते.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि.१५ जून २०२६



## थोडक्यात

### रोहित पवार यांच्या अन्नत्याग आंदोलनाला आम आदमी पार्टीचा पाठिंबा

पंढरपूर । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी पंढरपूर येथे सुरू असलेल्या आमदार यांच्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आम आदमी पार्टी, बीड जिल्ह्याच्या वतीने माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष) यांनी भेट दिली.




यावेळी अशोक येडे यांनी बीड जिल्ह्यात आम आदमी पार्टीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राबविलेल्या विविध आंदोलनांची माहिती दिली. यामध्ये केळवाटो आंदोलन, गाजर आंदोलन, आसूड आंदोलन तसेच शेतकरी हिताच्या विविध प्रश्नांवर पक्षाने केलेल्या संघर्षाची सविस्तर चर्चा केली. रोहित पवार हे शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतीमालाला हमीभाव, शेतीसंदर्भातील विविध प्रलंबित प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. त्यांच्या या लढ्याला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने भेट देऊन आंदोलनाला नैतिक समर्थन दिले. यावेळी सय्यद सादिक (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), राजेंद्रजी आमटे (शेतकरी हक्क मोर्चा), आकाश आमटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी जे कोणी संघर्ष करत आहेत, त्यांच्या पाठीशी आम आदमी पार्टी सदैव ठामपणे उभी राहील, असे मत जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांनी यावेळी व्यक्त केले.

### तिगावच्या सौ अर्चना राज पाटील यांना सरपंच आवार्ड २०२६ पुरस्कार प्रदान

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील तिगाव ग्रामपंचायत च्या सरपंच सौ अर्चना राज पाटील यांना एका दैनिकाचा सरपंच अवार्ड २०२६ पुरस्कार बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,अपर पोलीस अधीक्षक समीर शेख,दै लोकमतचे संपादक नंदकिशोर पाटील व उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दि १३ जुन रोजी ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर सर्वस्तरातुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.




सरपंच अवार्ड २०२६ मध्ये ग्रामपंचायत तिगाव अंतर्गत सौर ऊर्जेचा मोठ्या प्रमाणात प्रभावीपने वापर केला आहे.यामध्ये गावामध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक विहिरीवरील सोलार विद्युत पंप,गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,अंगणवाडी शाळा,गावातील सार्वजनिक ठिकाणी सौर पथदिवे आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वापर केला असल्याने विद्युत महामंडळाचे मोठ्या प्रमाणात विद्युत बचत केली असल्याचे दिसून येत आहे.गावामध्ये पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जलसिंचनाची कामे केली आसल्याने गाव टँकर मुक्त केले आहे.गावाला ५ तांडे ८ वस्त्याने गाव विखुरलेले आहे,परंतु या विखुरलेल्या गावाला रस्ता,लाईट,पाणी आदींची व्यवस्था सक्षमपणे ग्रामपंचायतचे ऊच्च शिक्षीत सरपंच सौ अर्चना राज पाटील यांनी केली आहे. या सर्व कार्याची दखल एका दैनिकाने घेतली आहे.त्यांना सरपंच अवार्ड २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख,दै लोकमत संपादक नंदकिशोर पाटील, इव्हेंट डिपार्टमेंट डेडवाल,अक्षय शाहूजी,लढा दुष्काळाची फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ड राज पाटील यांच्यासह सरपंच,उपसरपंच,ग्रामविस्तार अधिकारी,ग्राप सदस्यांसह ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ज्ञानराधा मल्टीस्टेटची कोट्यावधीची मालमता ठेवीदार परेशान प्रशासन वेळकडू भूमिकेत

**पाटोदा । प्रतिनिधी**

मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत शब्द दिला, जिल्ह्यातील नेत्यांनी आंदोलनाचे स्टंट केले... दोन वर्षे झाली, पण आज आमच्या हक्काच्या पैशासाठी आम्हालाच भिकाऱ्यासारखं जगावं लागतंय. हा बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या एका हताश ठेवीदाराचा जळजळीत सवाल आहे.

ज्ञानराधा संस्था बंद पडल्यापासून बीड जिल्ह्यातील आर्थिक घडी विस्कटली आहे. पैशांअभावी लग्ने रखडली, आजारपणाला पैसे मिळेनासे झाले आणि अत्यंत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे अनेक निष्पाप ठेवीदारांना आत्महत्येसारखे पाऊल उचलावे लागले. सुरुवातीला यावर राजकारण करणाऱ्या बीड जिल्ह्यातील नेत्यांचे चेहरे आता 'थंडगार' पडले आहेत. प्रशासनाने कर्जदारांकडून कोट्यवधींची वसुली केली खरी, पण हा जमा झालेला पैसा लोकांना वाटण्याऐवजी नक्की कुठे डाळ शिजतेय? हा आता चौकशीचा विषय बनला आहे. धक्कादायक वास्तव: बँक फायद्यात, ठेवीदार रस्त्यावर! अधिकृत कायदेशीर आकडेवारीवरून एक अत्यंत संतापजनक बाब समोर आली आहे. ज्ञानराधा सोसायटी ही प्रशासकीय नाकर्तेपणामुळे अडकली आहे. संस्थेकडे लोकांचे सगळे पैसे देऊनही करोडो रुपये शिल्लक उरतात. एकूण देणी ३१,५७० ठेवीदारांचे एकूण १,५२१.०० कोटी इतके दावे आहेत. एकूण जप्त मालमत्ता विविध यंत्रणांनी जप्त केलेली एकूण संपत्ती २,२७७.८६ कोटी आहे. शिल्लक अतिरिक्त निधी सर्व ठेवीदारांचे १००% पैसे व्याजासह परत केले, तरीही संस्थेकडे ७५६.८६ कोटी अतिरिक्त उरणार आहेत! असतानाही सामान्य माणसाला मात्र पैशासाठी हंबरडा फोडावा लागत आहे. हा प्रशासकीय छळ नाही तर काय? अब्जावधी रुपयांची वसुली झाली कुठे गायब? प्रशासनाने आणि तपास यंत्रणांनी संस्थाचालक व कर्जदारांना घेरून मोठी वसुली केली आहे. जप्त मालमत्तेचा अधिकृत आकडा थक्क करणारा आहे: ईडी अंदाजे १,६२७.८६ कोटींची मालमत्ता जप्त. महाराष्ट्र सीआयडी अंदाजे ४००.०० कोटींची मालमत्ता जप्त. लिक्विडेटरकडून कर्ज वसुली: १५०.०० कोटी रोख वसूल. प्रलंबित रोख वसुली (यशवंत कुलकर्णी): १००.०० कोटी. हाँगकाँग ट्रान्सफर मनी रिकव्हरी: कुटे फॅमिलीकडून ही रक्कम वसूल होण्याच्या मार्गावर आहे. मग प्रश्न पडतो: कर्जदारांकडून झालेली ही कोट्यवधींची वसुली लोकांपर्यंत का पोहोचत नाही? हा गोळा झालेला पैसा सरकार कुठल्या बँकेत ठेवून त्यावर व्याज खात आहे का? लोकांचा पैसा लोकांना न वाटता त्याचा 'भोपळा' का केला जात आहे? लिक्विडेटर आणि प्रशासनाची संशयास्पद संथ गती ५ जानेवारी २०२६ रोजी समोर आलेल्या पत्रांनुसार, एकूण ३१,५७० ठेवीदारांचे अर्ज आले आहेत. मल्टिस्टेट सोसायटी ॲक्टनुसार, अवसायक श्री. सतीश तोटावार यांनी आता वर्तमानपत्रात शेवटची ६० दिवसांची जाहीर सूचना देणे कायद्याने आवश्यक आहे, जेणेकरून सुटलेल्या ठेवीदारांना अंतिम संधी मिळेल आणि ६० दिवसांनंतर नवे अर्ज बंद करून थेट पैसे वाटप सुरू करता येईल. परंतु, ही अंतिम नोटीस काढायलाही प्रशासनाचे हात का धजावत नाहीयेत? नेते थंडगार; जनतेने आशा सोडली! निवडणुका आल्या की बीडच्या नेत्यांना ज्ञानराधाच्या ठेवीदारांची आठवण येते. मुख्यमंत्री महोदयांनी स्वतः आश्वासन दिले होते की, पैसा लवकरच परत मिळेल. पण सत्ता स्थापन झाली आणि नेत्यांचे खिसे भरले की गरीबांचे प्रश्न 'थंडगार' पडतात, याचा प्रत्यय बीडकरांना येत आहे. जिल्ह्यातील एकाही बड्या नेत्याने मुख्यमंत्र्यांच्या दालनात जाऊन या जप्त मालमत्तेचा लिलाव करून पैसे वाटप करण्यासाठी आक्रमक भूमिका घेतलेली नाही. आता न्यायालय आणि जनतेचाच आसूड हवा! जेव्हा देण्यापेक्षा ७५६ कोटी रुपये जास्त आहेत, तेव्हा सरकार आणि कोर्टाच्या तांत्रिक अडचणींचे रडगाणे कशासाठी? मुख्यमंत्र्यांनी तात्काळ ईडी, सीआयडी आणि लिक्विडेटर यांची संयुक्त बैठक घेऊन, 'विशेष कायदा' वापरून हा पैसा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करावा. अन्यथा, बीड जिल्ह्यातील जनतेचा हा संताप येत्या काळात सरकार आणि स्थानिक नेत्यांना चांगलाच महागात पडणार आहे.

## अजितदादांच्या स्मरणार्थ वृक्षारोपणाचा संकल्प; समर्थकांना वाटली आंब्याची रोपे

### हार-तुरे नाकारून वृक्षसंवर्धनाचा संदेश - अशोक डक यांचा समाजोपयोगी उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनाच्या पार्श्वभूमीवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक डक यांनी यंदाचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने साजरा केला. कोणताही जल्लोष, बॅनरबाजी किंवा हार-तुरे स्वीकारण्याऐवजी त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शुभेच्छुकांना केशर आंब्याच्या रोपांचे वितरण केले. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा समाजोपयोगी संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ रोजी वाढदिवसाचे औचित्य साधून शुभेच्छुक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांना केशर आंब्याच्या रोपांचे वितरण करण्यात आले.



यावेळी कोणतीही बॅनरबाजी करण्यात आली नाही तसेच हार, तुरे व पुष्पगुच्छ स्वीकारण्याचे टाळण्यात आले. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आदर्श यावेळी पाहायला मिळाला. महाराष्ट्राचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ केशर आंब्याची रोपे भेट स्वरूपात देऊन प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन अशोक डक यांनी केले.

यावेळी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या सर्वांचे आभार व्यक्त करताना अशोक डक म्हणाले, वाढदिवस हा केवळ उत्सवाचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची संधी आहे. पर्यावरणाचे संवर्धन ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे जतन करावे. या उपक्रमामुळे वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळी आणि समाजहिताची परंपरा निर्माण होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

**'एक रोप लावा, सावली व फळे मिळवा, पर्यावरण वाचवा' : अशोक डक**

वाढदिवस हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून समाजासाठी काहीतरी विधायक करण्याची संधी आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ एक रोप लावा, सावली व फळे मिळवा, पर्यावरण वाचवा हा संदेश देत उपस्थितांना वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनासाठी प्रोत्साहित करण्यात आले. पर्यावरणाचे रक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे मत अशोक डक यांनी व्यक्त केले.

## पान ६ वरुन...

### अन्नदाता वाचला तरच

कर्ज वसुली योजना ठरेल.

आ. रोहितदादा पवार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला बळ देण्यासाठी तसेच शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बीड येथे धरणे आंदोलन आयोजित केले आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी या धरणे आंदोलनात पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, शेतकरी हितचिंतक व संघटना, आणि शेतकरी बांधवांनी बहुसंख्येने या आंदोलनात सहभागी व्हावे. असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे

कर्जमाफी योजनेतील जाचक अटी रद्द करा!

सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या!

शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे!

### पुरुषोत्तमपुरी येथील बोट

आंधळे (वय ५३,रा. कुंभेफळ, ता. सिंदखेड,जि. बुलढाणा) या दोन महिला भाविकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला,तर काही भाविक जखमी झाले.प्रशासनाने यापूर्वी दिलेल्या नोटिसा व सुरक्षाविषयक सूचनांचे उल्लंघन करून धोकादायक पद्धतीने बोटीने प्रवासी वाहतूक केल्याप्रकरणी आरोपी उद्धव बळीराम गायकवाड व दुर्गा उद्धव गायकवाड (रा.चागतपुरी,ता. परतूर,जि. जालना) यांच्याविरुद्ध फिर्यादी नामदेव राजाराम कोकाटे ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पुरुषोत्तमपुरी यांनी फिर्याद दिली आहे. यावरून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०५,२२३ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास माजलगाव ग्रामीण पोलीस करत आहेत.या दुर्दैवी घटनेनंतर पुरुषोत्तमपुरी यात्रेदरम्यान गोदावरी नदीतील वाहतुकीच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. दरम्यान अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने कडक उपाययोजना करत गोदावरी नदीत बोट वाहतूक बंद केली आहे.

### शिवाजीनगर पोलिसांची

मोबाईल चोरट्यांनी हिसकावला. जुना धानोरा रोड, बडगुजर कॉलनी येथील मिराबाई बाळू मुळीक या त्यांच्या दोन मैत्रिणींसोबत सरस्वती विद्यालयासमोरून दळण घेऊन जात असताना, बाईकवर पाठीमागे बसलेल्या चोरट्याने त्यांचा मोबाईल पळवला.

के. एस. के. कॉलेज समोरून जात असलेल्या एका परिचारिका (नर्स) महिला यांच्या एप्रनच्या खिशातून चोरट्यांनी मोबाईल हिसकावून पळ काढला एकापाठोपाठ घडलेल्या या घटनांमुळे शिवाजीनगर पोलिसांसमोर चोरट्यांना पकडण्याचे मोठे आव्हान होते. प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांनी तात्काळ पावले उचलली. डीबी पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक लंके यांच्या नेतृत्वाखाली एकूण ५ पथके तयार करण्यात आली. शहरात दोन महत्त्वाच्या ठिकाणी तात्काळ नाकाबंदी लावण्यात आली. डीबी पथकाने अत्यंत वेगाने चक्रे फिरवून अवघ्या दोन तासांच्या आत तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. आवेश खान खाजा शेख (वय २२, रा. कानडी रोड, कोकीज पीर दर्गाजवळ, केज, गणेश श्रीराम मुंडे (रा. किल्ले धारूर रेस्ट हाऊस जवळ, किल्ले धारूर),ऋषिकेश लक्ष्मण वायबसे (वय १९, रा. कासारी, ता. केज, जि. बीड)९ मोबाईल रिकव्हर, चोरलेल्या मोबाईलचे पार्ट विकायचा 'फंडा'अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी हे अभिलेखावरील (रेकॉर्डवरील) गुन्हेगार असून त्यांच्यावर आधीच विविध गुन्हे दाखल आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यामुळेच त्यांची मैत्री झाली होती. मोबाईल चोरी करणे हा त्यांचा मुख्य 'फंडा' असून, चोरी केलेले मोबाईल विकण्याऐवजी ते त्यांचे स्पेअर पार्ट सुटे करून विकायचे, अशी कबुली त्यांनी दिली आहे. पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे त्यांच्या ताब्यातून एकूण ९ मोबाईल हस्तगत (रिकव्हर) करण्यात यश आले आहे.या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आरोपींनी संघटितपणे टोळी करून गुन्हे केल्यामुळे त्यांच्यावर नवीन कायद्यातील कडक कलमे लावली जाणार आहेत, जेणेकरून कोर्टात भक्कम पुरावे सादर करून त्यांना कडक शिक्षा होईल. तसेच जप्त केलेले इतर मोबाईल कोणाचे आहेत, याचा शोध घेऊन पुढील गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकट राम यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय दीपक लंके,पीएसआय काटकर, पीएसआय सागर सोन्ने, तसेच पोलीस अंमलदार रवी आधाव, बाळू राहाडे, ज्ञानेश्वर मराडे, सचिन आगलावे, अशोक राडकर, दिलीप राठोड, अनिल घटमाळ आणि शुभम सोनवणे यांच्या पथकाने केली आहे.

### शेतकरी हक्क मोर्चाचा

शेतकरी यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. कोणत्याही प्रकारच्या अटी शर्ती न ठेवता शेतकऱ्यांना शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा या विषयावर संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये शेतकरी जागृती अभिमान राबवणार आहे असे शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले. या वेळी अशोकराव येडे पाटील, सादेक भाई सय्यद, आकाश आमटे, मोहन गव्हाणे, महादेव आमटे, सोनू शेळके आदी उपस्थित होते.

## अल्पसंख्याक संरक्षण कायदा आंदोलनासाठी लोक सेना संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा राजीनामा

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्याक संरक्षण कायदा आंदोलनासाठी लोकसेना संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाचा मी ड. प्रा. इलियास इनामदार राजीनामा देत आहे जो पर्यंत समाजाला संरक्षण मिळणार नाही तो पर्यंत बेबाक़पणे लोकशाही मार्गाने लढणार भविष्यात कोणतीही निवडणूक लढवणार नाही व कोणत्याही राजकीय सामाजिक संघटनेचा पद घेणार नाही व कोणत्याही लाभाच्या पदावर काम करणार नाही मागील पंचवीस वर्षापासुन सामाजिक क्षेत्रात काम करत असताना व सामाजिक आंदोलनाद्वारे शिक्षण आरक्षण व संरक्षणावर दोन दोन लाखाचे मोर्चे काढले परंतु त्या आंदोलनाचा राजकीय भांडवल करुन कोणत्याही नेत्याकडे किंवा पक्षाकडे कसल्याही प्रकारचे निवडणूक तिकीट, पक्षाचे पद अथवा गुत्तेदारी मागीतलेली नाही व निवडणुकीत कोणत्याही नेत्याकडून कधी दहा रुपये घेतलेले नाही आणि यापुढेही घेणार नाही मौलाना मुफ्ती आरेफ साहेब उलेमा इकराम यांच्या समोर ईश्वराच्या (अल्लाहाच्या) घरात बसुन समाजाला एकजुट करणार व समाजासाठी संवैधानिक व लोकशाही मार्गाने संरक्षण लढा उभारणार बेमुदत उपोषण करणार असे आश्वासन दिलेले आहे आणि त्याच दिशेने काम सुरु आहे अशी माहिती ड. प्रा. इलियास इनामदार यांनी दिली आहे.



देशात व राज्यात अल्पसंख्याक मुस्लिम समाजावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत आहे जातीय दंगली मॉबलिचिंग हेटस्पिच धार्मिक स्थळांवर हल्ले करुन विटंबना करणे समाजावर बहीष्कार टाकणे सोशल मीडियावर अनाप शनाप वक्तव्य करणे जसे लांडे कठमुल्ले जेहादी हलालाच्या औलादी पाकिस्तानी बांग्लादेशी असे असंवैधानिक वक्तव्य करुन समाजाच्या भावना दुखावून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणे या पासुन अल्पसंख्याक समाजाचे मुस्लिम बौध्द क्रिश्चियन जैन पारसी सिख व विशेष करून मुस्लिम समाजाचे संरक्षण व्हावे या करिता अल्पसंख्याक संरक्षण संघर्ष समिती स्थापन झालेली आहे.व ही समिती शासनाकडे संवैधानिक व लोकशाही मार्गाने अल्पसंख्याक संरक्षण कायदा बनवावा म्हणून मागणी करत आहे व रस्त्यावरचेआंदोलन व न्यायालयाद्वारे लडाई लढणार आहे.

## आरोग्य मित्र प्रवीण जोगदंड यांच्या पुढाकाराने शिवणी भिल्ल वस्तीवर आयुष्मान भारत कार्ड नोंदणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने बीड तालुक्यातील शिवणी येथील भिल्ल वस्तीवर आयोजित करण्यात आलेल्या विशेष आयुष्मान भारत कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




आरोग्य मित्र प्रवीण जोगदंड यांच्या पुढाकारातून आणि आरोग्य मित्र वैभव भोले यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करून त्यांना आयुष्मान भारत कार्ड उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी नागरिकांना योजनेअंतर्गत मिळणाऱ्या मोफत आरोग्यसेवा, उपचार सुविधा तसेच शासनमान्य रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या लाभांची सविस्तर माहिती देण्यात आली. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांसाठी आयुष्मान भारत योजना मोठा आधार ठरत असून, या योजनेमुळे लाखो रुपयांपर्यंतचे उपचार मोफत मिळू शकतात, अशी माहिती उपस्थितांना देण्यात आली. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले.भिल्ल वस्तीपर्यंत प्रत्यक्ष जाऊन योजना पोहोचविणे, लाभार्थ्यांची नोंदणी करणे आणि त्यांना तात्काळ कार्ड उपलब्ध करून देण्याच्या कार्याबद्दल ग्रामस्थांनी आरोग्य मित्र प्रवीण जोगदंड व वैभव भोले यांचे विशेष कौतुक केले. शिबिरात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रत्येक पात्र नागरिकाकडे आयुष्मान भारत कार्ड असणे ही काळाची गरज आहे. आरोग्य संरक्षणासाठी ही योजना अत्यंत उपयुक्त असून सर्व पात्र नागरिकांनी आपले आयुष्मान भारत कार्ड तातडीने काढून घ्यावे, असे आवाहन आरोग्य मित्र प्रवीण जोगदंड व वैभव भोले यांनी केले.

## पाचव्या दिवशीही पत्रकारांचे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरुच

पात्रुड । प्रतिनिधी

येथील वादग्रस्त ग. नं १०५ मधील प्लॉट स्वतःच्या पत्नी व नातेवाईकांच्या नावे खरेदी केल्याप्रकरणी ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे यांच्या संदर्भात माजलगाव महसूल मंडळधिकारी यांनी तहसीलदार यांना दिलेल्या अहवालानुसार शिस्तभंगाची कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करुन कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करण्याच्या मागणीसाठी दि १० जुन रोजी पासुन माजलगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर पत्रकारांचे बेमुदत धरणे आंदोलन सुरू असुन हे आंदोलन दि १४ जुन रविवार रोजी पाचव्या दिवशीही सुरुच असुन याप्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्यांनी तलाठी आभारे प्रकरणी जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या अहवालाची प्रत देण्यास नकार दिल्याने मग्रूर तलाठी आभारे हा उपविभागीय अधिकाऱ्या पेक्षा मोठा आहे का? किंवा तलाठी आभारे यांच्या दबावाखाली येऊन आंदोलनकर्त्यांस अहवाल देत नाहीत असा संतप्त सवाल ही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे.

यासंदर्भात पत्रकारांच्या वतिने पत्रकार राजरत्न डोंगरे,पत्रकार नईम आतार, पत्रकार वाजेद पठाण यांनी दि २९ मे २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदन असे नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव उपविभागीय कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेले माजलगाव सज्जाचे ग्राम महसुल अधिकारी रुपचंद सुधाकर आभारे यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे.मौजे माजलगाव येथील वादग्रस्त गट नं. १०५ प्लॉट स्वतः च्या पत्नीच्या व नातेवाईकाच्या नावे खरेदी केल्या प्रकरणी तलाठी रुपचंद आभारे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा प्रस्ताव माजलगाव मंडळ अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे.यामध्ये अकबर दादामियाँ शेख रा.आयशा नगर माजलगाव यांनी तहसील कार्यालयाकडे या संदर्भात तक्रार अर्ज दाखल केलेला होता. त्यामध्ये माजलगाव येथील वादग्रसत गट नं. १०५ मधील क्षेत्राबाबत मा. दिवाणी न्यायालयात स्पे. दि.दा.क्रं.१९/२०२४ हा खटला सुरु असताना तसेच या प्रकरणात सह. दुय्यम निबंधक कार्यालयात विज पेन्डन्स देखील रजिस्टर आहे. म्हणजेच ही जागा पुर्णपणे कायदेशीर वादात अडकली असताना या गटातील मुळ मालक शफिक सत्तार बागवान यांनी अनेक लोकांना प्लॉट विक्री केले होते. या परिस्थीचा गैरफायदा घेत, संबंधित ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) रुपचंद आभारे




यांनी स्वतः च्या अधिकाराच्या क्षेत्रात येत असूनही सर्व नियम धाब्यावर बसवुन बेकायदेशीररित्या आपली पत्नी घोषणा रुपचंद आभारे उर्फ घोषणा चिंतामन तिमाडे यांच्या नावावर प्लॉट क्रं. १४ खरेदी केला. एवढ्यावरच न थाबंता त्यांनी पत्नीची बहिण (मेव्हणे) रजनी जितेंद्र उपासे यांच्या नावे सामाईक तसेच स्वतंत्रपणे प्लॉट नं.५ अणि प्लॉट नं. १५ असे कोट्यावधी रुपयांचे भुखंड खरेदी केले. गट नं. १०५ या वादग्रस्त गटातील खरेदीखताच्या आधारे फेरफार घेवुनही दि.२० जानेवारी २०२६ रोजी अर्जदाराने तक्रार अर्ज आक्षेप अर्ज माजलगाव तलाठी कार्यालयात देवुनही ग्राममहसुल अधिकारी रुपचंद आभारे यांनी दि. १८ जानेवारी २०२६ रोजी सर्व फेरफार नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर अत्यंत चालाखीने स्वतः च्या पत्नीच्या नावावर आसलेला फेरफार क्रं. १४८२४ वर कोणताही आक्षेप किंवा तक्रार प्राप्त असुनही नोंदवला नाही. मात्र त्याच दिवशी नोंदवलेल्या इतर सर्वसामान्य नागरीकांच्या फेरफार नोंदीवर आक्षेप नोदंवुन ते विवादग्रस्त नोंदवहीत वर्ग केले. परिणामी तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी आक्षेप नसलेला (तलाठी आभारे) यांच्या पत्नीचा व नातेवाईकांचा फेरफार मंजुर केला या संदर्भात मंडळ अधिकारी यांना तहसिलदार यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालात तलाठी रुपचंद आभारे यांचे गंभीर गैरवर्तन आढळुन आले आहे. शासकीय नियमाचे उल्लंघन करुन महसुल कर्मचाऱ्यांनी स्वतः च्या कार्यक्षेत्रात जमीन खरेदी करताना शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असताना तशी कोणत्याही प्रकारची परवानगी तलाठी आभारे यांनी घेतलेली नाही.हितसंबंधचा गैरफायदा घेत त्यावर मिळकतीचे प्रत्यक्षातले बाजार मुल्य शासकीय मुल्यांकन दरापेक्षा कैक पटीने जास्त आहे.स्वतः च्या आधिकाराचा गैरवापर करून खातेदारासोबत हितसंबंधाचा संघर्ष निर्माण करण्यात आलापदाचा वैयक्तीक फायद्यासाठी वापर करणे,संशयास्पद व्यवहार करणे आणि पक्षपाती वर्तन करण्याचा आहे.यामुळे महसुल प्रशासनाचे थेट उल्लंघन करणारे आहे. सबब संबंधित तलाठी यांच्यावर कडक शिस्तभंगाची कार्यवाही करुन व फौजदारी गुन्हा नोंदवण्यात यावा असा निष्कर्ष माजलगाव मंडळ अधिकारी यांनी माजलगाव तहसिदार यांना दिलेल्या अहवालात नोंदवला आहे.तलाठी रुपचंद आभारे यांच्या संदर्भात मंडळ अधिकारी माजलगाव यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार दिं ०८ जुन २०२६ पर्यत कार्यवाही करुन त्यांना कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करण्यात यावे, नसता याप्रश्नी उपविभागीय कार्यालय माजलगाव समोर दि.१० जुन बुधवार रोजीपासुन बेमुदत दररोज सकाळी ११:०० ते सायं ६:०० बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला होता. परंतु ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे यांच्यावर उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने पत्रकार राजरतन डोंगरे, नईम आतार व पत्रकार वाजेद पठाण यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर दि १० जुन बुधवार रोजी पासुन बेमुदत धरणे आंदोलनास बसले आसुन हे आंदोलन दि १४ जुन रविवार रोजी पाचव्या दिवशीही सुरुच असुन याप्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्यांनी तलाठी आभारे प्रकरणी जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या अहवालाची प्रत आंदोलनकर्त्यास देण्यास नकार दिल्याने मग्रूर तलाठी आभारे हा उपविभागीय अधिकाऱ्या पेक्षा मोठा आहे का? किंवा तलाठी आभारे यांच्या दबावाखाली येऊन उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले हे जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या अहवालाची सत्यप्रत देण्यास आंदोलनकर्त्यांस कशामुळे देत नाहीत असा संतप्त सवाल ही आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला आहे. या उपोषणास माजलगाव चे सामाजिक जेष्ठ नेते गोरख टाकणखार, सामाजिक जेष्ठ नेते राजाभाऊ भिसे, चंद्रकांत टाकणखार, पत्रकार किसन पवार,पत्रकार शेख अखिल यांनी उपोषणास पाठिंबा दिलाय.

**उपविभागीय कार्याल्यास कुलुप**

मग्रूर तलाठी आभारे यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी दि १० जुन पासुन पत्रकार उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बसले असुन दि १४ जुन रविवार रोजी या आंदोलनाचा पाचवा दिवस आहे परंतु उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू असताना सुद्धा उपविभागीय अधिकारी कार्यालयात कोणताही कर्मचारी व शिपाई नसुन उपविभागीय अधिकारी कार्यालयास कुलूप आहे.

# राज्यात मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू

## थेट गोठ्यावर मिळणार लसीकरणाची सेवा

पुणे : पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पशुधनाला विविध संसर्गजन्य आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने 'मान्सूनपूर्व रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम' राज्यभर सुरू केली आहे. पशुधनाचे आरोग्य अबाधित राखणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट असून, निश्चित करण्यात आलेल्या लक्ष्यांकित उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्तीसाठी विभागामार्फत व्यापक आणि काटेकोर नियोजन करण्यात आले.

पावसाळ्याच्या काळात पशुधनामध्ये घटसर्प व फऱ्या यांसारख्या संसर्गजन्य आणि घातक आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. या आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी मान्सूनपूर्व लसीकरण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. लसीचा परिणामकारकपणा कायम राखण्यासाठी शीतसाखळी व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला असून, राज्यस्तरापासून ग्रामीण भागातील उपकेंद्रांपर्यंत लसी सुरक्षित तापमानात पोहोचविण्यासाठी अद्ययावत कोल्ड बॉक्सचा वापर करण्यात येत आहे. मोहीम यशस्वी करण्यासाठी



जिल्हा आणि तालुका स्तरावर सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

आवश्यकतेनुसार लसींचा पुरेसा साठा आधीच वितरित करण्यात आला असून पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके गावागावांत आणि गोठ्यांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचून 'डोअर स्टेप' पद्धतीने लसीकरणाची सेवा देत आहेत. कोणतेही जनावर लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या मोहिमेचे आणखी एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे लसीकरणाचे डिजिटल आणि पारदर्शक व्यवस्थापन. प्रत्येक पशुधनाला लस दिल्यानंतर त्याची नोंद केंद्र शासनाच्या 'भारत पशुधन प्रणाली' वर तात्काळ करणे बंधनकारक करण्यात आले आहे. पशुधनाचे १२ अंकी ओळख बिल्ल्याद्वारे टॅगिंग करूनच नोंदणी केली जाणार असून, त्यामुळे मोहिमेच्या प्रगतीवर रिअल-टाइम देखरेख ठेवणे शक्य होणार आहे.

तसेच बनावट अथवा चुकीच्या नोंदींना आळा घालून लसीकरण मोहिमेची विश्वासार्हता आणि परिणामकारकता वाढण्यास मदत होणार आहे. पावसाळ्यात जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होण्याची शक्यता असते आणि संसर्गजन्य रोगांचा प्रसार वेगाने होऊ शकतो. त्यामुळे गाई, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांचे मान्सूनपूर्व लसीकरण करून घेणे आवश्यक आह. यासाठी पशुपालकांनी आपल्या जवळच्या शासकीय पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही पशुसंवर्धन आयुक्त डॉ. पाटील यांनी केले आहे.

# क्षारयुक्त पाण्यामुळे जमीनीचे नुकसान



महाराष्ट्रातील शेतकरी सिंचनासाठी प्रामुख्याने पृष्ठभागावरील पाणी आणि भूजलाचा वापर करत आहेत. पृष्ठभागावरील पाणी म्हणजे नद्या, तलाव यामधील पाणी जे हलके मानले जाते हर भूजल म्हणजेच विंधन विहिरी (भूगर्भातील पाणी) किंवा विहिरी मधील पाणी ज्यामध्ये क्षाराचे प्रमाण अधिक असल्याने ते जड मानले जाते. परंतु आता मागील काही वर्षापासून सिंचनासाठी भूजलाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे आणि परिणामी क्षारयुक्त पाण्याच्या अतिरिक्त वापर शेतीमध्ये सिंचनासाठी केला जात आहे. क्षारयुक्त पाण्याचा वापर वाढल्याने त्याचे दुष्परिणाम जमिनीवर व शेतीमधील उत्पादनावर दिसून येत आहेत.क्षार युक्त पाणी ठिबक सिंचनाद्वारे वापरल्यास ठिबक सिंचनाची विविध उपकरणे क्षार साठवुन खराब होत आहेत किंवा त्यांच्या कार्यक्षमतेत घट होत असल्याचे दिसून येत आहे.

पाण्यामधील क्षाराची कारणे : १) भूजलातील पाण्यामध्ये किती क्षार आहेत हे ठरण्यामागे तेथील भौगोलिक परिस्थिती, मातीतील क्षाराचे प्रमाण, खडकांचा प्रकार असे अनेक घटक कारणीभूत असतात.पावसाचे पाणी किंवा पृष्ठभागावरील पाणी जमिनीत मुरताना किंवा झिरपत असताना ते मातीतून, खडकांमधून वाहत जात असते. यावेळी मातीतील क्षार पाण्यात विरघळत असतात. २) साधारणत: क्लोरिन, बायकार्बोनेट, कॅल्शियम, मॅग्नेशियम, सोडियम, बोरॉन व लिथियम यांसारखे क्षार पाण्यात मिसळले जातात. ३) यासोबत आपण शेतामध्ये मोठ्या प्रमाणात वापरत असलेले रासायनिक खते व कीटकनाशके यामुळे देखील पाणी क्षारयुक्त होत आहे.

क्षारयुक्त पाण्यामुळे होणारे दुष्परिणाम : १) पिकांना सतत क्षारयुक्त पाणी दिल्यास जमिनीतील क्षाराचे प्रमाण वाढते. मातीवर क्षारांचा पांढरा थर जमा होतो व जमीन क्षारपड होते. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडून कस कमी होतो. तसेच क्षारपड झालेल्या जमिनीमध्ये बियाण्याची उगवण देखील कमी होते. २) सध्या सिंचनासाठी ठिबक सिंचन मोठ्या प्रमाणात वापरले जाते. परंतु ठिबक सिंचन ना मध्ये क्षारयुक्त पाणी वापरल्याने ठिबक सिंचन प्रणाली मधील नळ्यांमध्ये आणि छिद्रांमध्ये कॅल्शियम कार्बोनेटचे थर जमा होतात. व छिद्रे बुजून जातात. त्यामुळे पिकांना पाणी मिळत नाही. त्याचसोबत ठिबक सिंचन प्रणालीच्या देखभालीचा खर्च देखील वाढतो. ३) पाण्यातील क्षारांचा पिकांच्या मुळावर देखील दुष्परिणाम होतो. क्षारांमुळे पिकांच्या मुळांभोवती एक आवरण तयार होते. त्यामुळे मुळांची नीट वाढ होत नाही व परिणामी पिकांची वाढ खुंटते व उत्पन्नावर त्याचा परिणाम होतो.

# दुष्काळी परिस्थीतीत ऊस पिकाची अशी घ्या काळजी

दुष्काळी परिस्थीतीत ऊस पिकावर पाण्याचा ताण येत असल्यामुळे मुळांची वाढ खुंटते, अन्नद्रव्यांचे शोषण, पाने कोमजतात, आणि पिकाची एकूण वाढ मंदावते. याशिवाय उसामध्ये साखर संचयन कमी होते त्यामुळे उतारा कमी मिळतो आणि उत्पादनही कमी मिळते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सूक्ष्मजीव, सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मअन्नद्रव्ये, जैवसंजीवके, पोटॅशची फवारणी केल्यास पिकाची वाढ आणि उत्पादन टिकवता येते. दुष्काळी परिस्थितीत जमिनीतील सूक्ष्मजीवांची संख्या कमी होते. अशा वेळी जमिनीत वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटने बनवलेल्या सॉईल हेल्थचा वापर करावा. यामुळे सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता वाढते आणि मातीचे आरोग्य सुधारते. यामुळे सेंद्रिय पदार्थांचे विघटन चांगले होऊन अन्नद्रव्ये पिकांना सहज उपलब्ध होतात. सॉइल हेल्थ १ लिटर प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून लागण झाल्यानंतर तसेच लागणीनंतर ४५, ९० आणि १२० दिवसांनी आळवणी केल्यास मुळांची वाढ सुधारते व कमी पाण्यातही ऊस पिकाला आवश्यक पोषण मिळते. मातीतील ओलावा जास्त काळ टिकवून ठेवणे फार महत्त्वाचे असते. यासाठी ह्युमिक ॲसिडचा वापर फायद्याचा ठरतो.




तसेच मुळांची वाढ होऊन अन्नद्रव्यांचे शोषण सुधारते. ह्युमिक ऍसिड १ लिटर प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून लागण करतेवेळी आणि लागणीनंतर १२० दिवसांनी आळवणी करावी.

असे आहेत काही उपाय :मातीमधील ओलावा कमी असल्यावर सूक्ष्मअन्नद्रव्यांचे शोषणही कमी होते. ते वाढवण्यासाठी मल्टीन्यूट्रीयंट २ लिटर प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून लागणीनंतर ६० दिवसांनी आणि ३ लिटर प्रति एकर ३०० लिटर पाण्यात मिसळून ९० दिवसांनी फवारणी केल्यास दुष्काळाचा ताण कमी होण्यास मदत होते. पाण्याच्या तुटवड्यामध्येही पिकाची जोमदार वाढ टिकवण्यासाठी आणि पिकाची ताण सहन करण्याची शक्ती वाढवण्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटचे वसंतऊर्जा उपयुक्त ठरते. १ लिटर वसंतऊर्जा २०० लिटर पाण्यात मिसळून प्रति एकर लागणीनंतर ३०, ६०, ७५ आणि ९० दिवसांनी फवारणी केल्यास पिकामध्ये ताजेपणा टिकून राहतो, वाढ सुधारते आणि कमी पाण्यातही उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होते. दुष्काळी परिस्थितीत पिकाने तग धरण्यासाठी त्याला २ टक्के पोटॅशची फवारणी करावी. पोटॅशमुळे वनस्पतीमधील पाण्याचे संतुलन राखण्यास मदत होते. यासाठी म्युरेट ऑफ पोटॅश किंवा सल्फेट ऑफ पोटॅश म्हणजेच पांढरा पोटॅश २० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून त्याची फवारणी करावी. १०- १५ दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या केल्यास उसाची वाढ, कांड्यांची मजबुती आणि उत्पादन टिकवून ठेवण्यास मदत होते.

# कलम करण्याच्या विविध सुधारित पद्धती

फळझाडांची अभिवृद्धी बियांपासून केली तर झाडे उंच वाढतात व फळे धरण्यास अधिक कालावधी लागतो. त्यासोबत मातृवृक्षासारखे चांगली फळे आणि उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे औषध फवारणी, छाटणी, फळांची काढणी इत्यादी कमी खर्चिक व त्रासदायक होता त्यामुळे फळझाडांची योग्य प्रमाणात कलमे करतात. तसेच नवीन संकरित जाती निर्माण करण्यासाठी कलमांची खुंट तयार करण्यासाठी आणि पपया तसेच एकदल पिकांच्या अभिवृद्धीसाठी बीयांचा वापर आवश्यक ठरतो.

कलमांच्या सुधारित पद्धती :मृदूकाष्ट कलम - या पद्धतीने आंबा, काजू, फणस, चिकू आणि कोकम इत्यादी फळझाडांची अभिवृद्धी करता येते. या पद्धतीत व कोय कलम करण्याच्या पद्धतीत कोणताही बदल नाही. परंतु या पद्धतीत खुंट म्हणून वापरले जाणारे रोप उंच वाढलेले आणि आंब्यामध्ये तीन महिने वयाचे पहिली फूट जून झाल्यावर तर काजूमध्ये ४५ ते ६० दिवसाचे असते. या रोपावर येणाऱ्या नवीन शेंड्याकडील कोवळ्या फुटीवर कलम केले जाते. या पद्धतीने ज्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष आहे अशा डोंगर-उताराच्या जागेवरच दोन ते तीन रोपे वाढवून त्यावर मृदूकास्ट पद्धतीने कलम करून घेता येते. कोरड्या आणि उष्ण हवामानामध्ये लावलेल्या कलमांची मोठ्या प्रमाणावर मर होते. अशा ठिकाणी या



पद्धतीने कलमे करावीत. आंब्यामध्ये ही कलमे करण्यासाठी फेब्रुवारी ते एप्रिल हा काळ योग्य आहे तर काजूमध्ये थंडीचा हंगाम वगळता वर्षभर केव्हाही कलमे करता येतात. यामध्ये ८५ टक्के यश मिळते.

बगल कलम- या पद्धतीमध्ये दीड ते अडीच वर्षे फळझाडांची रोपे खुंट म्हणून वापरतात. या पद्धतीत सुमारे ६० टक्के यश मिळते. आंब्यामध्ये या पद्धतीने ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये कलमे करावीत. या पद्धतीने कलमे करताना आणि नंतर पाणी देण्याची गरज नाही.

कोपाईस कलम- बियांपासून केलेल्या काजूच्या / आंब्याच्या जुन्या, कमी उत्पन्न देणाऱ्या आणि कमी गुणवत्तेच्या झाडाचे चांगल्या, जातिवंत आणि जास्त उत्पन्न देणाऱ्या झाडांमध्ये रूपांतर करण्यासाठी कोपाईस कलम पद्धत वापरावी. या पद्धतीमध्ये पंधरा वर्षे वयापर्यंत याची झाडे जमिनीपासून सुमारे ७५ सेंटीमीटर ते १ मीटर उंचीचे खोड ठेवून करवतीने छाटून टाकावीत. डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत झाडांची छाटणी करावी.

छाटलेल्या खोडापासून २५ ते ३० नवीन फुटवे येतील. त्यापैकी खोडाच्या वरील ३० ते ४५ सेंटिमीटर भागातून निघणारे चार ते पाच जोमदार निरोगी फुटवेअर निवडून त्यावर मृदू काष्ट पद्धतीने फेब्रुवारी ते एप्रिल या हंगामात कलम बांधावे. फाटलेल्या खोडाला खोड किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ५० टक्के पाण्यात मिसळणारी कार्बारिल भुकटी चे द्रावण आणि रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी बोर्डो पेस्ट चा दरवर्षी जून ते जुलैमध्ये लेप द्यावा. तसेच उन्हामध्ये संपूर्ण उघड्या पडलेल्या खोडांना सावली करावी.

व्हीनियर कलम - या पद्धतीत आठ ते दहा महिने वयाची रोपे खुंट म्हणून वापरतात. या खुंटावर एका बाजूस सुमारे पंधरा सेंटीमीटर वर पाच ते सात सेंटिमीटर लांबीचा तिरकस उभा काप घ्यावा. या कापाची खोली खुंटाच्या जाडीच्या एक तृतीयांश पेक्षा जास्त नसावी. नंतर या कापाच्या खालच्या टोकास थोडासा आडवा व तिरकस काप घेऊन साल व आतील भाग काढून घ्यावा. नंतर मातृवृक्षाच्या काडीवर पाच ते सात सेंटिमीटर आकाराचा तिरकस काप घ्यावा आणि ही फांदी खुंटावर दिलेल्या कापावर व्यवस्थित बसवून घ्यावी. सुमारे वीस दिवसात काडीला नवीन फूट येते वही फूट पाच ते सात सेंटिमीटर वाढल्यानंतर जोडावर असलेला खुंटाचा शेंडा कापून टाकावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६२ : इंग्लंडमधे प्रतिष्ठित असलेल्या 'रॉयल सोसायटी'ची स्थापना
१६७४ : मुघल सरदार बहादुरशाह कोकलताश याच्या ताब्यात असलेल्या पेडगावची मराठ्यांनी लूट केली. सुमारे १ कोटिची लूट रायगडावर जमा झाली.
१९१६ : जगभरात विमान, रोटरक्राफ्ट, रॉकेट, उपग्रह, दूरसंचार उपकरणे आणि क्षेपणास्त्रांची रचना आणि विक्री करणारी अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी बोईंग ची स्थापना करण्यात आली.
१९२६ : मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट अशी उपनगरी बस सेवा सुरू झाली.
१९२७ : समाजाला कुटुंबनियोजन आणि लैंगिक समस्यांसंबधी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने र. धों. कर्वे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुरु केलेल्या 'समाजस्वास्थ्य' या मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९५५ : आण्विक अस्त्रांवर बंदी घालणाऱ्या मैनाउ जाहीरनाम्यावर १८ नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी स्वाक्षऱ्या केल्या. नंतर आणखी ३८ नोबेल पारितोषिक विजेत्यांनी त्याला मान्यता दिली.
१९५५ : पंडित जवाहरलाल नेहरू यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर
१९६२ : शिक्षणक्षेत्रातील महत्त्वपूर्ण व यशस्वी प्रयोग मानल्या जाणार्या 'ज्ञानप्रबोधिनी' या संस्थेचा पुणे येथे प्रारंभ
१९७९ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
१९९६ : स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर
१९९७ : पर्यावरणवादी कार्यकर्ते महेशचंद्र मेहता यांची रॅमन मॅगसेसे पुरस्कारासाठी निवड
२००६ : ट्विटर हा सर्वात मोठा सोशिअल प्लॅटफॉर्म सुरु झाला.
२०११ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने आपल्या ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण वाहन पीएसएलव्हीद्वारे आधुनिक संप्रेषण उपग्रह जीसॅट-१२ अंतराळ कक्षेत यशस्वीरित्या स्थापित केला.
२०१४ : जागतिक युवा कौशल्य दिन

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६०६ : रेंब्राँ डच चित्रकार (मृत्यू: ४ आक्टोबर १६६९)
१६११ : मिर्झा राजे जयसिंग (मृत्यू: २८ ऑगस्ट १६६७)
१७८३ : पर्शियन भारतीय व्यापारी व दानवीर जमशेदजी जीजाभाई यांचा जन्मदिन.
१८४० : स्कॉटिश इतिहासकार, सांखिकीतज्ञ, संकलक आणि भारतीय नागरी सेवेचा सदस्य विलियम विलसन हन्टर यांचा जन्मदिन.
१९०३ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (मृत्यू: २ आक्टोबर १९७५)
१९०४ : गानतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका (मृत्यू: १० फेब्रुवारी २००१)
१९०५ : चौधरी मुहम्मद अली पाकिस्तानचे ४ थे पंतप्रधान (मृत्यू: २ डिसेंबर १९८०)
१९०९ : भारतीय स्वतंत्रता सेनानी, मुत्सदी, वकील व आंध्रप्रदेश राज्याच्या पहिल्या महिला राजनेता दुर्गाबाई देशमुख यांचा जन्मदिन.
१९१७ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९७९)
१९२७ : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: २९ जून २०१०)
१९३० : नोबल पारितोषिक विजेता अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ लिओन एम. लेडर मैन यांचा जन्मदिन.
१९३२ : नरहर कुरुंदकर विद्वान, टीकाकार आणि लेखक (मृत्यू: १० फेब्रुवारी १९८२)
१९३३ : भारतीय लेखक आणि पटकथालेखक एम. टी. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३६ : भारतीय हिंदी पत्रकारिता, लेखक आणि राजकीय विश्लेषक प्रभास जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : भारतीय पत्रकार श्री प्रभाज जोशी यांचा जन्म. (मृत्यू: ५ नोव्हेंबर २००९)
१९४९ : माधव कोंडविलकर दलित साहित्यिक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२९१ : रुडॉल्फ (पहिला) जर्मनीचा राजा (जन्म: १ मे १२१८)
१५४२ : लिओनार्डो दा विंची यांच्या पेंटिंग मोना लिसा मधील महिला लिसा डेल जिकॉन्डो यांचे निधन. (जन्म: १५ जून १४७९)
१९०४ : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (जन्म: २९ जानेवारी १८६०)
१९१९ : एमिल फिशर रासायनिक प्रक्रियेद्वारे शर्करा रेणूंच्या निर्मितीसाठी १९०२ मध्ये नोबेल पुरस्कार मिळालेले जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ९ आक्टोबर १८५२)
१९५३ : ऑर्डर ऑफ दी इमिटेशन ऑफ क्राइस्ट चे संस्थापक भारतीय आर्चबिशप गिवरगीस मार इव्हानिओस यांचे निधन. (जन्म: २१ सप्टेंबर १८८२)
१९६७ : नारायण श्रीपाद राजहंस तथा 'बालगंधर्व' गायक व नट (जन्म: २६ जून १८८८)
१९७९ : मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावोदियाझ ओर्दाझ यांचे निधन.
१९९१ : जगन्नाथराव जोशी जनसंघ व भाजपचे नेते, गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक, संसदपटू, वक्ते (जन्म: ? ? १९२०)
१९९८ : ताराचंद परमार गांधीवादी कार्यकर्ते व स्वातंत्र्यसैनिक
१९९९ : इंदुताई टिळक सामाजिक कार्यकर्त्या
१९९९ : जगदीश गोडबोले पर्यावरणवादी लेखक व सामाजिक कार्यकर्ते
२००४ : डॉ. बानू कोयाजी कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणार्या सामाजिक कार्यकर्त्या. त्यांना पद्मभूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार, रामेश्वरदास बिर्ला राष्ट्रीय पुरस्कार, पुण्यभूषण पुरस्कार, पुणे विद्यापीठातर्फे डॉक्टर ऑफ लेटर्स (१९५५) इ. पुरस्कारांनी गौरविण्यात आले. पुण्यातील के. इ. एम. रुग्णालय, जहांगीर नर्सिंग होम, दैनिक सकाळ, इंडिया फांउडेशन इ.संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. (जन्म: २२ ऑगस्ट १९१८)


राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
सोमवार दि.१५ जून २०२६
५


# गोंदी पोलीसांकडून वाळु तस्करावर स्थानबध्दतेची कारवाई

अंबड । प्रतिनिधी

शरीराविरुध्दच्या गुन्हयातील आरोपी वाळु तरकर इसम पंकज सखाराम सोळुंके वय ३७ वर्षे रा. गोंदी ता. अंबड याचेवर वाळु चोरी करणे, शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, लोकसेवकांना मारहाण करुन दुखापत करणे, शिवीगाळ करणे, गैरकायदयाची मंडळी जमवून कट रचून खुनाचा प्रगत्न करणे, अवैध वाळू तस्करी करणे, जीवे ठार मरण्याच्या भमक्या देणे, सार्वजनिक रस्त्यामध्ये सामान्य लोकांना आडवुन मारहाण करणेबाबतचे गुन्हे दाखल असून सदर इसमावर प्रतिबंधात्मक कारवाई करुनही त्याचे वर्तनात काही एक फरक पडत नराल्याने आरोपी पंकज राखाराम सोळुंके नय ३७ वर्षे याचेवर महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड हातभट्टीवाले, औषधी द्रव्य बिषयक गुन्हेगार, भोकादायक व्यवती, कश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (कीडीओ पायरेट्स) वाळू तस्कर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम



१९८१ अन्वये स्थानबध्दता करण्याबाबत मा. वरीष्ठांच्या मार्फतीने प्रस्ताव पाठवला होता. त्यास मा. जिल्हादंडाधिकारी यांनी सदर प्रस्तावला दिनांक ०२/०१/२०२६ रोजी मंजूरी दिली होती.

सदर स्थानबध्दतेचा आदेश दिल्यापासुन पोलीस ढाणे गोंदी अधिकारी/अंमलदार त्याचे मागावर होते परंतु सदरचा दसग हा सराईत असल्याने त्यास खबर लागताच तो पसार होत होता. परंतु दिनांक १३/०६/२०२६ रोजी मा. पोलीस अधिक्षक पथक व गोदी पोलीस ठाणे यांनी संयुक्तरित्या सदर इसमाची गोपनीय खबरी व तांत्रिक बाबींच्या अधारे माहीती काढून त्यास पोलीस ठाणे जवाहर नगर छत्रपती संभाजीनगर शहर हद्दीतुन ताब्यात घेतले आहे. सदरची कारवाई मा.श्री तेगबीर सिंह संधु, पोलीस अधिक्षक , मा.श्री विक्रम साळी, अपर पोलीस अधिक्षक , मा. श्री सिध्देश्वर धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली गोंदी पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सपोनि अमोल गुरले, पोउपनि हारी जंगले सहा. फौ फुलचंद हजारे, मा. पोलीस अधिक्षक पथकाचे सपोनि अविनाश गडाख, सहा. फौ १०८९ बरडे, पो.ह ९८० कोकणे, पो.कॉ १४०९ जी.एम.हरबक, पो.कॉ १७५१ एन.टी. बकाल, पो.कॉ १७३३ व्हि. के हळदे, पो.कॉ १५७९ एम.व्ही. बोराडे, पो.ह. ९४९ सागर बावीस्कर, पो.ह.१३४७ संदीप मांन्टे यांनी केली असुन सदर स्थानबध्द इसमास मा. जिल्हाधिकारी सो जालना यांनी दिलेल्या आदेशानुसार ०१ वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी दाखल करण्यात आले आहे.

# नारायणा स्कुलच्या शिक्षकाकडून अल्पवयीन विद्यार्थीनीवर अत्याचार




जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील नामांकित असल्याचा स्वतःच मोठा गाजावाजा करून विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांकडून लाखो रूपयांच्या देणग्या आणि फिस उकळणाऱ्या नारायणा ई-टेक्नो स्कूलमधील नववीच्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर शाळेतील शिक्षकाकडूनच अत्याचार केल्याची अत्यंत संतापजनक आणि तितकीच वेदनादायी घटना जालन्यात उघडकीस आली आहे.

याप्रकरणी कदीम जालना पोलिसांनी नराधम शिक्षक विक्की रॉबिनसन शिंदे (रा. गोकुळवाडी, जालना) याच्या विरोधात अत्याचाराचा गुन्हा दाखल केला असून त्याला अटक केली आहे. दरम्यान, हा किळसवाणा प्रकार समोर येताच जालना शहरातील पालकांनी या शाळेच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला असून नारायणा स्कुलसारख्या आणखीही काही शाळा उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून पोलीसांनी या बाबीचा गांभीर्याने शोध घ्यावा अशी मागणी पालकांनी केली आहे.

# महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी एकजुटीने संकल्प



जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील भाजप व शिवसेनेच्या नगरसेवकांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, आ.अर्जुनराव भाऊ खोतकर, माजी आमदार कैलासजी गोरंटयाल, उमेदवार सुहास सिरसाठ, भास्कर आंबेकर, महापौर वंदना ताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीला भाजप व शिवसेनेचे सर्व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी विधानपरिषद निवडणुकीची रणनीती, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील समन्वय आणि महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी आवश्यक नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, ''ही निवडणूक केवळ उमेदवाराची नसून महायुतीच्या विचारांची आणि विकासाच्या राजकारणाची निवडणूक आहे. सर्व नगरसेवकांनी एकजुटीने काम करून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार सुहास सिरसाठ यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करावे. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून महायुतीच्या विकासकामांची माहिती द्यावी आणि ही निवडणूक विक्रमी मताधिक्याने जिंकावी. माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात संघटनात्मक बळावर भर देत सांगितले की, ''भारतीय जनता पार्टी आणि महायुतीची ताकद ही तळागाळातील कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी आहेत. प्रत्येक नगरसेवकाने ही निवडणूक स्वतःची समजून काम करावे. राज्यातील महायुती सरकारने विकासाला गती दिली असून त्याचा लाभ जनतेपर्यंत पोहोचला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीसाठी आणि विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी सुहास सिरसाठ यांचा विजय महत्त्वाचा आहे.

आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, ''महायुतीतील सर्व घटक पक्ष एकदिलाने या निवडणुकीत उतरले आहेत. भाजप आणि शिवसेनेच्या नगरसेवकांमध्ये उत्तम समन्वय असून प्रत्येक मताचे योग्य नियोजन करून विजय निश्चित करायचा आहे. ही निवडणूक संघटनशक्तीची आहे आणि महायुतीची एकजूटच आपल्याला मोठे यश मिळवून देईल.

# निवडणूक निरीक्षक यांनी केली स्वराज्य निवडणूक मतदान केंद्रांची पाहणी

जालना । प्रतिनिधी

मा. निवडणूक निरीक्षकांची स्थानिक स्वराज्य निवडणूक केंद्राची केली पाहणी तसेच जालना जिल्ह्यास निवडणूक तयारीचा आढावा व मतदान केंद्रांची पाहणी केली असून.औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ विधान परिषद निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, सदर कार्यक्रमानुसार मतदान प्रक्रिया दिनांक १८ जून २०२६ रोजी तर मतमोजणी दिनांक २२ जून २०२६ रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने आज दिनांक १४ जून २०२६ रोजी मा. निवडणूक निरीक्षक डॉ. श्री. संजय जी. कोलते, भाप्रसे, आयुक्त, साखर आयुक्तालय, पुणे यांनी जालना जिल्ह्यास भेट दिली. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे निवडणूक तयारीबाबत आढावा बैठक घेतली.



सदर बैठकीस श्री. शशिकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. विक्रम साळी, अप्पर पोलीस अधीक्षक, जालना तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.बैठकीमध्ये मतदान प्रक्रिया सुलभ, पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पाडण्यासाठी करण्यात आलेल्या तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, मतदान साहित्याची उपलब्धता, मनुष्यबळ नियोजन तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती मा. निरीक्षकांना देण्यात आली. त्यानंतर मा. निवडणूक निरीक्षकांनी तहसील कार्यालय, जालना तसेच तहसील कार्यालय, अंबड येथे स्थापन करण्यात आलेल्या मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील मतदान व्यवस्थेची पाहणी केली. मतदान केंद्रांवरील आवश्यक सुविधा, मतदान कक्षांची रचना, मतदारांसाठी करण्यात आलेल्या सोयी तसेच सुरक्षा व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी मतदान केंद्रांची तयारी चांगली असल्याचे नमूद केले. यावेळी मतदान प्रक्रियेत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन करून निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडावी, अशा सूचना मा. निवडणूक निरीक्षकांनी दिल्या.

# गोविंद बाबर यांची पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड



परतुर । प्रतिनिधी

दैठना खुर्द (ता. परतूर) येथील गोविंद विठ्ठलराव बाबर यांची नाशिक मध्यवर्ती कारागृह येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील सेवाकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या यशाबद्दल गावात आनंदाचे वातावरण असून, युवकांसाठी ते प्रेरणादायी ठरले आहेत.सत्कार कार्यक्रमास गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**जालना : जिल्ह्यातील प्रतिष्ठित नागरिक, उद्योगपती व समाजसेवक तसेच कालिका स्टीलचे संचालक श्री घनश्याम सेठ गोयल यांची अखिल भारतीय अग्रवाल संमेलनच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांना भेट देऊन शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुनील सेठ गोयल, गोपाल सेठ गोयल, डॉ. सुभाष अजमेरा, मेघराज चौधरी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी श्री घनश्याम सेठ गोयल यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.**

# खतांच्या तुटवड्यावरून शेतकरी आक्रमक

## क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिंतूर - कनेरगावनाका मार्गावर रास्ता रोको

परभणी । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना सरसगट कर्जमाफी द्यावी, बियाणे, खतांचा तातडीने मुबलक पुरवठा करावा यासह इतर मागण्यांसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने गुरुवारी सकाळी आकरा वाजता जिंतूर ते कनेरगावनाका



मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामुळे गोरेगाव मार्गे विदर्भात जाणारी वाहतूक सुमारे दोन तास ठप्प झाली होती.

राज्यात शेतकऱ्यांसाठी शासनाने कर्जमुक्तीची घोषणा केली, मात्र सदर योजना फसवी असल्याचा आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे. या शिवाय बाजारपेठेत डीएपी खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. बियाणे व खते नसल्याने अनेक ठिकाणी जादा दराने खते खरेदी करावे लागत आहेत. या शिवाय घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या अनुदानाचे हप्ते थकल्यामुळे घरकुलाचे स्वप्न पूर्ण करणेही कठीण झाले आहे. शासनाने सरसकट कर्जमाफी द्यावी यासह इतर मागण्यांसाठी क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने जिंतूर ते कनेरगाव नाका मार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी क्रांतिकारी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे, जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, प्रवीण मते, श्याम मते, विठ्ठल वायचाळ, सखाराम भाकरे, अशोक जयस्वाल, दामोदर घुमणार, बबन कांबळे, विशाल पोळ, राहुल कावरखे, मनोहर सावके, संदीप मानमोठे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी गोरेगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हनुमंत भिंगारे, जमादार अनिल भारती यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

अधिकाऱ्यांच्या आश्वासनाने आंदोलन मागे

नायब तहसीलदार सरोदे, कृषी विभागाचे गुण नियंत्रण अधिकारी काळे, सेनगाव पंचायत समितीचे विस्तार अधिकारी देशमुख यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन मागण्या जाणून घेतल्या. या मागण्या शासनाकडे कळविण्याचे आश्वासन देण्यात आले. त्यानंतर दोन तासांनी रास्ता रोको मागे घेण्यात आला. यावेळी गोरेगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक हनुमंत भिंगारे, जमादार अनिल भारती यांच्यासह कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त ठेवला होता.

**टीसी हरवला आहे**

ह्यतिक विष्णू धांडगे वय २३ वर्ष रा.राहेरा ता.घनसावंगी जि. जालना याची सावरकर महाविद्यालय बीड येथील बीए प्रथम वर्षाची टि.सी. दि.३०/०४/२०२६ रोजी १५.०० वाजेच्या सुमारास राहेरा ते घनसावंगी प्रवास दरम्यान कोठेतरी हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्क

७६२०६१३९२३

# उदगीर-अहमदपूर मार्गावर एसटी बस उलटली; अनेक प्रवाशी जखमी

लातूर। प्रतिनिधी

उदगीर-अहमदपूर मार्गावरील सुकणी गावाजवळ शुक्रवारी (दि.१२) दुपारी एसटी बस पलटी होऊन अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात काही प्रवासी जखमी झाले असून गंभीर जखमींना उपचारासाठी उदगीर येथील सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित एसटी बस उदगीरहून अहमदपूरकडे जात असताना सुकणी गावाजवळील अरुंद पर्यायी रस्त्यावर समोरून येणाऱ्या वाहनाला साईड देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघातानंतर बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. काही प्रवासी बसमध्ये अडकून



पडले होते. घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे बसमध्ये अडकलेल्या सर्व प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात आली.

अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना त्वरित उपचारासाठी उदगीरच्या सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. काही जणांना किरकोळ दुखापत झाली असून गंभीर जखमींवर वैद्यकीय उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस व संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली असून अपघाताची पुढील चौकशी सुरू आहे.

# कुख्यात गुंड 'शेख कलीम'ची हर्सूल कारागृहात रवानगी!

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुंडगिरी, अवैध धंदे तसेच वाळू माफियांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बीड पोलिसांनी अत्यंत मोठी आणि धडक कारवाई केली आहे. सामान्य नागरिकांसह थेट शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ले करून दहशत पसरविणाऱ्या पेठ बीड परिसरातील कुख्यात गुंड शेख कलीम शेख जमाल (वय ४१ वर्षे, रा. बारादरी मज्जिद जवळ, इस्लामपुरा, पेठ बीड) याच्यावर (एम.पी.डी.ए.) कायद्यांतर्गत कारवाई करून त्याची छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत आणि जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन यांच्या खंबीर नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात गुन्हेगारांचे कंबरडे मोडण्यासाठी ही कडक मोहीम हाती घेण्यात आली आहे.

शासकीय नोकरांवर हल्ले आणि दहशत

स्थानबद्ध करण्यात आलेला आरोपी शेख कलीम हा अत्यंत धोकादायक आणि सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर शिवाजीनगर, बीड शहर आणि पेठ बीड पोलीस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. यामध्ये:

शासकीय नोकरांवर जीवघेणे हल्ले करणे आणि त्यांना कर्तव्यापासून परावृत्त करणे.

लोकांना रस्त्यात अडवून दारूसाठी पैशांची मागणी करणे, मारहाण व जीवे मारण्याची धमकी देणे.

शासकीय कार्यालयातील सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे व जबरी चोरीचा प्रयत्न करणे.

यापूर्वी त्याच्यावर बी.एन.एस.एस. २०२३ च्या कलम १२९ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली होती, मात्र त्याच्या वर्तणुकीत कोणताही बदल झाला नाही. त्याच्या या गुन्हेगारी वृत्तीमुळे सामान्य जनता आणि शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते.



जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश आणि पोलिसांची धडक कारवाई

आरोपीच्या वाढत्या कारवाया लक्षात घेता, पेठ बीड पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस अधीक्षकांमार्फत जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे चझऊ- अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांनी २२ मे २०२६ रोजी आरोपीला तात्काळ ताब्यात घेऊन हर्सूल कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश पारित केले.

आरोपी न्यायालयीन कोठडीत असल्याने, पेठ बीड पोलिसांनी माननीय न्यायालयाची रीतसर परवानगी घेतली. त्यानंतर काल, दिनांक १३ जून २०२६ रोजी दुपारी १२:३२ वाजता त्याला कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन कडक पोलीस बंदोबस्तात हर्सूल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे रवाना करण्यात आले.या पथकाने बजावली कामगिरीही धडक कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली; स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पेठ बीड पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोनि श्री. मारुती खेडकर, सध्याचे प्रभारी पोनि श्री. निलेश केळे, पोलीस उपनिरीक्षक श्री. मन्सूर शहा, पोलीस हवालदार सुभाष मोठे, नितीन राठोड, नितेश माने आणि पोलीस अंमलदार गिरी यांनी फत्ते केली.

.........

पोलीस अधीक्षकांचा कडक इशारा:

भविष्यातही वाळूचा बेकायदेशीर व्यापार (वाळू माफिया), अवैध गुटखा विक्री, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे, तसेच समाजात जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणारे समाजकंटक आणि खंडणीबहाद्दर गुंडांवर चझऊ- कायद्यांतर्गत अशीच कठोर कारवाई करण्यात येईल.

– श्री. नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड.

## संजय गांधी श्रावण बाळ ना पंतप्रधान लाभार्थ्यांचे मिळाले नाही अनुदान

चौसाळा । प्रतिनिधी

शासनाच्या वतीने तहसीलच्या माध्यमातून वृद्ध व आबाल नागरिकांना संजय गांधी श्रावण बाळ या योजनेसह आधीचे अनुदान सुरू आहे

**वृद्ध नागरिकांची घोर कुचंबना**

सदर लाभार्थ्यांचे अनुदान जवळपास तीन महिने होऊनही खात्यावर आलेले नाही त्यामुळे वृद्ध नागरिकांची अनुदान विना घोर कुचंबना होत आहे सदर प्रकरणी माहिती अशी की तहसील खात्याच्या वतीने सदर लाभार्थ्यांना अनुदान दरमहा मिळते सदर अनुदान हे जवळपास दोन ते तीन महिन्यापासून त्यांच्या खात्यावर पडलेच नाहीत त्यामुळे सदर लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित राहावे लागत आहे तर अनेक वृद्ध नागरिकांना बँकेत चकरा मारतात परंतु सदर अनुदान त्यांच्या खात्यात न जमा झाल्याने त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होत आहे अनुदानाबाबत चौकशी केली असता असे कळते की शासनाच्या महाडीबीटी पोर्टल वरील संजय गांधी श्रावण बाळ आणि मुख्यमंत्री वयोश्री अशा एकूण ७२ सेवा तात्पुरत्या स्वरूपात अनु उपलब्ध असल्याने १५ जून २०२६ पर्यंत महाडीबीटी पोर्टल वर तात्पुरती सेवा बंद असल्याने सदर अनुदान पाठविण्याची कार्यवाही सुरू झाली नाही त्यामुळे लाभार्थ्यांना खात्यावर अनुदान पडत नसल्याचे कळते दरम्यान सदर अनुदानाचे पोर्टल तातडीने सुरू करून संजय गांधी श्रावण बाळ तसे मुख्यमंत्री वयश्री योजने सह आदि अनुदान तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करून आबाल व वयोवृद्ध लाभार्थ्यांची होत असलेली उपासमार थांबवावी अशी मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे.

## अन्नदाता वाचला तरच देश वाचेल–राजेंद्र मस्के

### आ. रोहीत दादा पवार यांच्या आंदोलनास' पाठिंबा देण्यासाठी बीड मध्ये आज धरणे आंदोलन

बीड प्रतिनिधी

राज्य सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटी तात्काळ रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी, या मागणी साठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे युवा नेते तथा आ. रोहितदादा पवार यांनी १२ जूनपासून पंढरपूर येथे अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.

परंतु अद्याप राज्य सरकारने सकारात्मक प्रतिसाद देऊन कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्का साठी सुरू असलेल्या या संघर्षाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) बीड जिल्ह्याच्या वतीने सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे धरणे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.





राज्यातील लाखो शेतकरी नापिकी, वाढता उत्पादन खर्च, अपुरा हमीभाव, नैसर्गिक संकटे आणि कर्जाच्या वाढत्या ओझ्यामुळे गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत कर्जमाफी योजनेतील जाचक अटी शेतकऱ्यांवर अन्याय करणाऱ्या ठरत असून त्या तात्काळ रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देणे गरजेचे असल्याची भूमिका पक्षाने मांडली आहे. प्रत्येक कर्जबाजारी शेतकऱ्याला समान न्याय मिळाला पाहिजे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यासाठी

जाचक अटींचा फेरविचार करणे गरजेचे आहे.

अन्यथा ही कर्जमाफी योजना नसून ◀◀ पान ३ वर

## शिवाजीनगर पोलिसांची कामगिरी: महिलांचे मोबाईल पळवणारी टोळी गजाआड; ९ मोबाईल जप्त

बीड । प्रतिनिधी

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रविवारी दिवसाढवळ्या धुमाकूळ घालत, अवघ्या १५ ते २० मिनिटांच्या अंतराने तीन महिलांचे मोबाईल हिसकावून पळवणाऱ्या अट्टल चोरांच्या टोळीला शिवाजीनगर डीबी (गुन्हे शोध) पथकाने अवघ्या दोन तासांत बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांच्या या तत्परतेमुळे नागरिकांमधून कौतुक होत असून, शिवाजीनगर पोलिसांची आठवड्यातील ही दुसरी मोठी आणि चांगली कामगिरी ठरली आहे.




चोरट्यांनी रविवारी एकामागून एक तीन घटना घडवून पोलिसांना थेट आव्हान दिले होते. मोटरसायकलवरून आलेल्या तीन चोरट्यांनी स्वराज्य नगर कमान समोरून फोनवर बोलत जात असलेल्या अश्विनी कृष्णा सुर्वे (रा. दीप हॉस्पिटलकडे जाताना) यांच्या हातातील ◀◀ पान ३ वर

## पुरुषोत्तमपुरी येथील बोट दुर्घटना प्रकरणात दोघाविरुध्द ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

पुरुषोत्तमपुरी येथील गोदावरी नदीत भाविकांची वाहतूक करणारी बोट पलटून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाल्याची दुर्घटना दि १० जून रोजी सकाळी १०:०० ते ११:०० वाजण्याच्या दरम्यान घडली होती.या दुर्घटने प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलिसांनी दोघांविरुद्ध क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतुक केल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केला आहे.



**पुरुषोत्तमपुरी येथे दोन महिला भाविकांचा झाला होता मृत्यू**

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी येथे अधिक मासानिमित्त यात्रा महोत्सव सुरू आहे.यात्रेनिमित्त आलेल्या भाविकांना गोदावरी नदीत ये जा करण्यासाठी

बोटीचा वापर केला जात होता.दि १० जून रोजी सकाळी १०:०० ते ११:०० वाजण्याच्या सुमारास गोदावरी नदीपात्रात संबंधित बोट चालकाने त्यांच्या बोटीत निर्धारित क्षमतेपेक्षा जास्त भाविकांना बसवून वाहतूक केली. बोटीमध्ये अधिक प्रवासी घेतल्यास अपघात होण्याची आणि जीवितहानी होण्याची शक्यता आहे याची माहिती असूनही बोट चालकाने निष्काळजीपणे बोट वाहतूक केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. दरम्यान,प्रवाशांने भरलेली बोट गोदावरी नदीपात्रात पलटल्याने अनेक भाविक पाण्यात पडले.या दुर्घटनेत प्रमिला शेषराव राठोड (वय ५५, रा. बीबी,ता.लोणार, जि.बुलढाणा) आणि कांता ज्ञानदेव ◀◀ पान ३ वर

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान येथील अधिकमासनिमित्त हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानमध्ये अधिकमासानिमित्त दि. ७ जूनपासून मठाधिपती महंत शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्याची आज दि.१४ रविवार रोजी श्री ह.भ.प. बबन महाराज बहिरवाळ (श्री संत मदन महाराज संस्थान, कडा) यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात सांगता झाली.

गुरुवर्य महंत मठाधिपती महादेव भारती महाराज व मठाधिपती शांतीब्रह्म तुकाराम भारती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह उत्साहात पार पडला. सांगता प्रसंगी बबन महाराज बहिरवाळ यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

यावेळी ह.भ.प. अर्जन महाराज येडे, ह.भ.प. रंजीत महाराज, ह.भ.प. बबन महाराज वायकर, ह.भ.प. तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. बाबासाहेब महाराज शिंदे, किशोर महाराज येडे, माऊली महाराज शेळके, ह.भ.प. बाबा देशमुख महाराज, अशोक येडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या कीर्तनातून बबन महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण यांच्या बाललीलांपासून ते अवतारसमाप्तीपर्यंतच्या जीवनप्रवासाचे रसाळ निरूपण केले. हे विश्वच माझे घर या तत्त्वज्ञानाचा संदेश देत नामस्मरण, समभाव आणि विश्वबंधुत्व हीच खरी भक्ती असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.




सप्ताहादरम्यान विविध नामवंत कीर्तनकारांनी समाजप्रबोधनपर कीर्तनसेवा दिली. दि. ७ जून रोजी ह.भ.प. रंजित महाराज शिंदे (निनगुर), दि. ८ रोजी ह.भ.प. बाबासाहेब महाराज शिंदे (वैद्यकिन्ही), दि. ९ रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज उबाळे (च-हाटा), दि. १० रोजी ह.भ.प. दत्ता महाराज वायभट (पिंपरनई), दि. ११ रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर (वरवटी), दि. १२ रोजी ह.भ.प. सुरेश महाराज जाधव (न्यूज १८ मराठी, बीड जिल्हा प्रतिनिधी) तसेच दि. १३ रोजी ह.भ.प. बबन महाराज मंझरीकर यांनी कीर्तन सेवा दिली.

पंचक्रोशीतील विविध गावांतील मृदंगाचार्य, वारकरी व भजनी मंडळांच्या सहभागातून हरिजागर, प्रवचन, भजन, हरिपाठ, पारायण, गाथा व काकडा यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाशिवरात्र उत्सव समिती बेलगाव, बेलगाव तरुण मंडळ आणि विश्वस्त मंडळ यांच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले.

पुरणपोळीच्या महाप्रसादाचा लाभ

काल्याच्या कीर्तनानंतर पंचक्रोशीतील भाविकांनी घरून वाजतगाजत आणलेल्या पुरणपोळ्या, गुळवणी, आमटी, कुरडई व भजी यांच्या महाप्रसादाचा भाविकांनी मोठ्या श्रद्धेने आस्वाद घेतला.या संपूर्ण सप्ताहात पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली

## शेतकरी हक्क मोर्चाचा रोहित पवार यांच्या आंदोलनास पाठिंबा –राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड मध्ये पहिल्यांदा कर्जमाफी शासन निर्णयाची होळी करण्यात आल्यानंतर कर्जमाफी शासन निर्णयाची होळी करण्याची शृंखला महाराष्ट्रभर सुरू झाली. पंढरपूर येथे अन्नदात्या शेतकऱ्यासाठी अन्नत्याग आंदोलन रोहित पवार यांनी सुरू केले या आंदोलनास भेट देऊन रोहित दादा पवार यांच्याशी चर्चा करून शेतकरी हक्का मोर्चा च्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी होत नाही तोपर्यंत शेतकरी हक्क मोर्चा गावो गावी जाऊन सरकारने दिलेली फसव्या कर्जमाफी योजने विषयी जण जागृती करून




गावो गावी जाऊन सरकारच्या फसव्या कर्जमाफीच्या शासन निर्णयाची होळी करणार असल्याचे राजेंद्र आमटे यांनी घोषणा केली.

नागपूर आंदोलनानंतर सरकारकडून सरसकट कर्जमाफी शेतकऱ्याना मिळवून देण्याच्या ऐवजी बच्चू कडू यांनी स्वतःच्या आमदारकी पदरात पाडून घेण्याचे काम केले कच्चू कडू यांनी केले बच्चू कडू हा शेतकऱ्याचा गुन्हेगार आहे बच्चू कडू यांनी शेतकरी आंदोलन मातीत घालण्याचे काम केले.

◀◀ पान ३ वर

## केज-अंबाजोगाई रोडवर रात्रीच्या वेळी लूटमार करणारे दोन दरोडेखोर जेरबंद

केज । प्रतिनिधी

केज ते अंबाजोगाई रोडवर चाकूचा धाक दाखवून पती-पत्नीला लुटणाऱ्या अट्टल गुन्हेगारांचा फिल्मी स्टाईल पाठलाग करून केज पोलिसांनी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून, पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे परिसरातील नागरिकांमधून कौतुक होत आहे.

चाकूचा धाक दाखवून लूटमार

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १३ जून २०२६ रोजी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी धनराज नामदेव सूर्यवंशी (वय ३० वर्ष, रा. पिसेगाव, ता. केज) हे त्यांच्या पत्नीसह मोटारसायकलने (क्र. चक ४४ - २४३०) पिसेगाव फाट्यावरून गावाकडे जात होते. पिसेगाव फाट्यापासून काही अंतरावर एका मोटारसायकलवरून आलेल्या चार अनोळखी इसमांनी फिर्यादी यांची गाडी अडवली. त्यानंतर चाकूचा धाक दाखवून त्यांना धमकावत त्यांच्याकडील रोकड आणि सोन्याचे दागिने हिसकावून घेतले. सूर्यवंशी पती-पत्नीने आरडाओरडा केल्यामुळे घाबरलेले चोरटे त्यांची स्वतःची एक मोटारसायकल घटनास्थळीच सोडून जंगलात पळून गेले.

पोलिसांची तातडीने चक्र फिरली

घटनेची माहिती मिळताच केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने, सहा. फौजदार फुलचंद सानप, पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, पोलीस अंमलदार गोविंद मुंडे, सहा. फौजदार शंभुदेव दराडे आणि डीबी (गुन्हे शोध) पथकाचे अंमलदार अनिल नागरगोजे व देवगुडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळावरून चोरांची मोटारसायकल (क्र. चक४५ ट ८१८३) जप्त केली.




थरारक पाठलाग आणि अटक

फिर्यादींनी दिलेल्या वर्णनावरून पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरांची खात्री केली. चोरटे केज शहरातून कळंब रोडने मोटारसायकलवरून जात असताना पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण कीर्तने व पोह. अनिल नागरगोजे यांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला. मात्र, चोरट्यांनी पोलिसांना गुंगारा देत भरधाव वेगात गाडी पळवली.

पोलीस पथकाने त्यांचा थरारक पाठलाग केला. हॉटेल संतोष पॅलेस समोर चोरटे आपली मोटारसायकल (क्र. चक४४ ए ३५७६) सोडून पळून जात असताना, पोलिसांनी झडप घालून दोघांना रंगेहात पकडले.अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे:शेषेराव हिम्मत शिंदे (वय ५० वर्ष, रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव) भिमा आबा काळे (वय १९ वर्ष, रा. दत्तनगर ढोकी, जि. धाराशिव)

अटक करण्यात आलेला मुख्य आरोपी शेषेराव शिंदे याची अंगझडती घेतली असता, त्याच्याकडे गुन्ह्यात लुटलेली रोख रक्कम मिळून आली आहे. या प्रकरणातील अन्य दोन फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.या प्रकरणी फिर्यादी धनराज सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३७१/२०२६ नुसार, भारतीय न्यायसंहिता (इछड) कलम ३०९(४) आणि ३०९(६) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार फुलचंद सानप पुढील तपास करत आहेत.सदरची धडक कामगिरी बीड जिल्ह्याच्या प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम आणि सहायक पोलीस अधीक्षक श्री. व्यंकटराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलीस ठाण्याच्या संपूर्ण पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26